

श्रीबाबांची जगप्रसिद्ध धुनी

श्री साईनाथ ग्रन्थालय
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

ऑगस्ट १९८२ ]

[ किंमत एक रुपया

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :
**श्री.क.हि.काकरे**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
डॉ.श्री.दि.परचुरे
एम. ए. पी. एच. डी.
(इंग्रजी आवृत्ती)

श्री.सदानंद चेंदवणकर
(मराठी आवृत्ती)

**श्रीसाई वाक्सुधा**

वर्ष ६१ वे) किंमत १ रुपया (अंक ५

ऑगस्ट १९८२

: कार्यालय :
'साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई ४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३३६१

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

सद्गुरूचे पायीं न विनटतां ।
यथार्थ स्वरुप येईना हाता ।
संत श्रीहरिस्वरुप स्वतः ।
कृपा हस्ता प्रार्थावे ॥ ११ ॥

गुरूचरणाची आवडी ।
हेचि आपुली सर्वस्व जोडी ।
संत सहवासाची गोडी ।
प्रेम परवडी लागो आम्हां ॥१२॥

जया पूर्ण देहाभिमान ।
तया न साजे 'भक्त' अभिधान ।
स्वयें जो पूर्ण निरभिमान ।
खरें भक्त पण त्या अंगी ॥१३॥

जया ज्ञातृत्वाचा ताठा ।
श्रेष्ठत्वाचा अभिमान लाठा ।
केवळ दंभाचा जो बसवटा ।
तयाची प्रतिष्ठा ती काय ॥१४॥

आपुल्याच गुरूची कीर्ति ।
अभागी जे प्रेमें न गाती ।
बधिर नसूनिजे नायकती ।
ते मंदमति मूर्तिमंत ॥१५॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ४९ वा.

## गणपत्यथर्वशीर्षम्



ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः
भद्रं पश्येमाक्षाभिर्य जत्राः ।
स्थिरैरंगे स्तुष्टवांसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ॥ १ ॥
ॐ स्वस्ति न इन्द्रो वृद्धाश्रवाः ।
स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।
स्वस्ति नस्तार्क्ष्यौ अरिष्टनेमिः ।
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥ २ ॥

हे श्रीगणेशा, आम्हाला चांगल्या गोष्टी ऐकायला येवोत. डोळ्यांना चांगले पहावयास मिळो. स्वस्थ अशा शरीराने आमच्याकडून देवाचे स्तवन घडो, आणि दिलेले संपूर्ण आयुष्य आम्हाला प्राप्त होवो. सर्वश्रेष्ठ इंद्र, सर्वज्ञानी सूर्य, संकटांचा नाश करणारा गरुड आणि बृहस्पती आमचे कल्याण करोत. सर्वत्र शांती नांदो.

# अनुक्रमणिका ऑगस्ट १९८२




| | |
|---|---|
| १) संपादकीय | – देव भावाचा भुकेला |
| २) श्री सिद्धारूढ स्वामी | – साईनंद |
| ३) श्री संत गुलाबराव महाराज | – |
| ४) श्री साईबाबांची कृपा | – श्री. यशवंत वगळ |
| ५) भक्ती आनंदाची चित्कळा | – प्रा. र. श्री. पुजारी |
| ६) राणी छाप रुपयांची खैरात | – श्री. प्रभाकर कोळमकर |
| ७) माझे गुरू श्रीसाई | – सौ. सुनिता चावक |
| ८) श्री साईबाबांचा लाडका शामा | – सौ. उषाताई मुळे |
| ९) बाबा आहेत तरी कसे | – निलीमा ज. नाईक |
| १०) तयाचिया मी मागे पुढे........ | – सौ. नीता खामकर |
| ११) बाबांचा कृपाशिर्वाद लाभलेले महाभाग | – सौ. उषा अधिकारी |
| १२) खालील प्रसंग कोणत्या अध्यायात | – श्री. माधव गोरे |
| १३) श्री सिद्धारूढ स्वामी ज्योतिषातून | – श्री. चिंतामण शिंत्रे |
| १४) भारतातील श्रीबाबांची मंदिरे | – |
| १५) दर्शनासाठी | – कु. सुधा शिवलकर |
| १६) श्रीसाई | – श्री. वि. म. पुराणिक. |
| १७) वाद कशाला | – श्री. रा. ग. गुप्ते |
| १८) मशिदीत प्रगटला साईजगदीश्वर | – प्रा. हरीभाऊ बोबडे |
| १९) साई ध्यान | – डॉ. मा. चिं. दिक्षित |
| २०) घ्या नाम मुखी श्रीसाई | – श्री. वी. पोतनीस |
| २१) शिरडीचे फळ | – श्री. सुरेंद्र पाटील |
| २२) श्रीसाई प्रसन्न | – सौ. शारदा वाकनीस |
| २३) नामरूपा | – श्री. महादेव साने |
| २४) एक थे बाबा | – कु. कल्पना वापीवाला |
| २५) श्री साईबाबा | – श्री. विठ्ठल याळगी |
| २६) साई महिमा | – श्री. स. मा. मुऱ्हार |
| २७) शिरडीवृत्त | – जून १९८२ |

# देव भावाचा भावाचा !

स. न. वि. वि.




आजच्या या कलीयुगात म्हणा, 'विज्ञानयुगात' म्हणा, अथवा 'अणुयुगात' म्हणा, परमेश्वराने पृथ्वीवरील आज कुठल्याही भक्ताला अथवा माणसाला 'प्रत्यक्ष दर्शन' दिल्याचं कुठेच ऐकिवात नाही. म्हणून 'परमेश्वर' या कलीयुगात म्हणजे आज पृथ्वीवर नाहीच! असेच आपण समजायचे का ? छे! छे ! असे नाही. पण जो 'नास्तिक' त्याला मात्र परमेश्वर वगैरे कुणीच नसून, परमेश्वराविषयी ऐकवण्यात येणाऱ्या कथांवर त्याचा कधीच विश्वास बसणार नाही.

कोणी काहीही म्हणो ! पण परमेश्वर आज सुद्धा या कलीयुगात पृथ्वीवर वावरताना नव्हे भक्तांना अनेक प्रकारे, अनेक रूपांनी, अनेक तऱ्हेने मदत, साहाय्य करताना दृष्टीस पडतो. मात्र परमेश्वराला अनेक रूपात पहाण्यासाठी आपल्यात सामर्थ्य इवे आहे आणि अंगी पात्रता हवी आहे–' भावाची आणि भक्तिची. अंतरात परमेश्वराविषयी दृढ भक्ति आणि भाव असेल तर या कलीयुगातील 'परमेश्वर' आपणाला विविध रूपांनी नटलेला सजलेला दिसल्याशिवाय रहाणार नाही.

या ब्रह्मांडाचा मालक आणि चालक तोच आहे. त्याच्या कृपेमुळेच आपणाला उत्तम असा नरदेह मिळालेला आहे. ही त्याचीच कृपा म्हणायची त्याच्या सत्तेशिवाय या जगतातील कुठलेच कार्य चालू शकत नाही. झाडाचे पानसुद्धा परमेश्वराच्याच इच्छेनुरुप झोका घेते. अणूरेणूमध्ये सुद्धा परमेश्वर लपून रहातो. इतके अतिसूक्ष्म रूप तो धारण करू शकतो. अर्जुनाला कुरुक्षेत्रावर घडलेले 'विश्वरूप' 'विराटस्वरूप' सुद्धा तो क्षणार्धात धारण करू शकतो. पृथ्वीवरील वृक्षलतांच्या फुलाफुलातून त्याचे 'हास्य' आपणास आनंदित करून सोडते. मन चैतन्याने भरून जाते. परमेश्वराच्या हास्यातूनच 'वारा' वहात आहे आणि आपणास जगवित आहे. ही का थोडी कृपा आपणावर आहे ?

विश्वातील 'अणुरेणू'त परमेश्वर भरून उरला आहे. तो सर्वव्यापी सर्वसाक्षी असा आहे. पृथ्वीवरील प्राणीमात्राला त्याच्या बऱ्यावाईट गोष्टीबद्दल प्रायश्चित देणारा तोच एक आहे. 'जळी स्थळी–पाषाणी' त्याचे रहाणे आहे. चांगले कर्म करणाऱ्या

माणसाला त्या चागल्या कार्याचे फळ ( यश ) तोच देतो. तसेच वाईट कृत्य करणाऱ्याला योग्य ते शासन तोच 'पालनकर्ता' करतो. आपण जे जे काही कर्म करतो ते ते सर्व सर्वव्यापी सर्वसाक्षी परमेश्वर पहात असतो. हे अनेकांना माहीत असते. पण तरीसुद्धा काही अभक्त, अज्ञानी लोक परमेश्वराकडे दुर्लक्ष करतात. परमेश्वराकडे जो दुर्लक्ष करतो त्याच्याकडे परमेश्वर सुद्धा दुर्लक्षच करीत असतो.–

पण नुसतेच दुर्लक्ष करीत नसून त्या माणसाला योग्य ते फळ दिल्याशिवाय कधीच रहात नाही. म्हणूनच तर म्हटले आहे की —

**जैसा करम करेगा वैसा फल देगा भगवान ।**
**ये है गीता का ज्ञान ये है गीता का ज्ञान ॥**

म्हणून माणसाने जीवनदात्या परमेश्वराकडे सदैव लक्ष देऊन आपले कर्म योग्य तऱ्हेने व उत्तम रितीने केले पाहिजे.

परमेश्वरावर मनापासून जो 'प्रेम' करतो. अंतःकरणापासून जो त्याची नियमित भक्ति करतो, त्याचे गुणगान गातो, अशा भक्ताची परमेश्वर कधीच उपेक्षा करीत नसतो. अशा भक्ताची परमेश्वर कधीच हेळसांड करीत नसतो. प्रत्येक कार्यात अशा माणसाला यश दिल्याशिवाय रहात नाही. अशा अनन्य भावाने भक्ती करणाऱ्या भक्ताची देव न सांगता सर्व कामे करून देतो. कारण भक्तासाठीच तर परमेश्वराचे जीवन आहे. मनापासून भक्ति करणाऱ्या भक्ताचे या दुःखमय संसारातील त्याचे सारे जीवन आनंदाने नव्हे चैतन्याने भरून टाकल्याशिवाय रहात नाही. मात्र केव्हा केव्हा अशा भक्ताला थोडी 'सबुरी' म्हणजे अवकाश धरावा लागतो. म्हणून तर संत तुकाराम महराज आपल्या एका अभंगात म्हणतात––

**धीर ते कारण । साह्य करी नारायण**

परमेश्वराची आराधना करणाऱ्या प्रत्येक भक्तांनी थोडी सबुरी घ्यावी धीर धरावा. तेव्हाच परमेश्वर साह्य करीत असतो. कलीयुगातील प्रत्येक माणसांनी किंवा भक्तांनी आपणाला परमेश्वर वेळोवेळी साह्य करीत आहे क्षणोक्षणी येणाऱ्या संकटापासून वाचवित आहे हे कसे समजावे ? हा एक गहन प्रश्न आहे ! परमेश्वराची मनापासून भक्ती करणाऱ्या भक्ताची परमेश्वर केव्हाच उपेक्षा करीत नाही हे खास. मग तो साह्य करतो हे निश्चीत. पण तो साह्य करतो याचा अर्थ असा नव्हे की जनाबाईला देवांनी दळण दळून दिले. तसे किंवा कबिरांना जसे शेले विणून दिले

तसे मला परमेश्वर हल्ली तुम्हा आम्हाला दळण दळून देणार नाही! याचे कारण सुद्धा फार गहन आहे. कलियुगातील माणसांकडून जनाबाईसारखी किंवा कबिरासारखी भक्ती होणे अशक्य आहे. म्हणूनच हल्ली प्रत्यक्ष परमेश्वर अविरत होऊन अशी कामे करणे अशक्य आहे.

पण तो आपल्या भक्ताला वेळोवेळी साह्य करतो व आता सुद्धा साह्य करीत आहे हे मात्र खास. आजच्या कलीयुगात परमेश्वराची भक्ती करणाऱ्या हरएक भक्ताची कामे तो अनेक रूपांनी येऊन करीत आहे. मात्र आपल्या अंगी परमेश्वराची भक्ती करण्याची तेवढी पात्रता हवी आहे. मना पासून भक्ति केली पाहिजे. अंतःकरणातील प्रेम त्याच्या पायाशी वाहिले पाहिजे. रात्रंदिवस आपल्या हृदयमंदिरी त्याचीच 'सगुण सावळी' मूर्ती बसविली पाहिजे. मनाला त्याच्या दर्शनाची त्याच्या भक्तीची विलक्षण ओढ आणि वेड लागावयास हवी. आपणाकडून होणारी भक्ती भावपूर्ण असली पाहिजे, श्रद्धापूर्वक असली पाहिजे.

तरच परमेश्वर भक्ताला अनेक प्रकारे अनेक रूपांनी साह्य करीत असतो. नाहीतरी परमेश्वराला भक्ताच्या मनातील 'भाव आणि भक्तिच' पहायची असते! कारण देव हा भावाचा भुकेलेला आहे. त्याला भावाविण आणिक कशाचीही आस नाही. म्हणूनच तर म्हटले आहे की—

**देव भावाचा, भावाचा**
**नाही कुणाच्या बापाचा ॥**

देव जर आपणास मिळावासा वाटत असेल तर त्यासाठी आपणाला मना पासून, अंतःकरणापासून भक्तिच करावयास हवी. मनात भाव नसताना देवाला कितीही प्रकारे पूजा तरी देव तुम्हा आम्हाला पावणार (प्रसन्न) नाही. मनी नाही भाव आणि म्हणे देवा मला पाव! अशानी का कुठे देव धावणार आहे.! देवाला साध्य करावयाचे असेल तर मनी भावच धरला पाहिजे. त्यासाठीच कुठे तरी म्हटले आहे की—

**भाव धरा रे भाव धरा। देवाला आपुलासी करा।**

मनी भाव नसेल तर रात्रंदिवस भक्ति करून काहीच उपयोग होणार नाही. मनात देवा विषयी खरोखर भाव असेल तरच माणसाने भक्तिचे नाटक करावे नाही पेक्षा कोरडी आणि दिखाऊ भक्ति करूच नये. म्हणूनच संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात—

या भक्तीत सुद्धा हृदयाचा ओलावा हवा आहे आणि त्या भक्तीत चंचल मनाला एकाग्र करूनच 'त्या सर्वसाक्षी' परमेश्वराचे ध्यान आणि चिंतन करावयास हवे. भावेविण भक्ति करून चालणार नाही. विनाकारण आपले श्रम वाया जातील, म्हणून परमेश्वर प्राप्तीसाठी भाव धरूनच भक्ती करावयास हवी. तेथे अहंकार असता कामा नये म्हणून परमेश्वराची भक्ती करणाऱ्या भाविकांना पुन्हा पुन्हा आग्रहाने सांगावेसे वाटते की—

**देव भावाचा भावाचा**
**नाही कुणाच्या बापाचा ॥**

★


## श्रीसाईलीला
## भव्य दिवाळी अंक १९८२
# भक्त अनुभव विशेषांक

**१ नव्हेंबर १९८२ रोजी थाटात प्रसिद्ध होणार**

साईभक्तांनी बाबांच्या विषयी आलेले आपले ताजे अनुभव अगदी थोडक्यात कागदाच्या एकाच बाजूने लिहून पाठवावेत. आपले अनुभव १५ ऑगस्ट १९८२ पर्यंतच आमचे हाती यावेत. त्यानंतर आलेल्या अनुभव मजकुरांचा स्वीकार करता येणार नाही.

सर्व मजकूर संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०१४ येथेच पाठवावा.

मुखपृष्ठावर भगवान श्रीसाईनाथांचे बहारदार चित्र

**किंमत २ रु.)** **(पृष्ठे १२८**

२५३

**भावेविण भक्ति । भक्तिविण मुक्ति**
**बळे विण शक्ति । बोलू नये**

नुसते पंढरीला न चुकता पंधरा वाऱ्या करून चालत नाही. अथवा शिरडीला साईनाथ महाराजांची भेट घेऊन जमत नाही. तुम्ही साईनाथ महाराजांना भेटावयाला शिरडीला जा. अथवा हजारो रुपये खर्च करून विठोबा रखुमाईला भेटायला पंढरपूरला जा. अथवा अन्य कुठल्याही पुण्यक्षेत्री जा. फक्त मनात 'भाव आणि श्रद्धा' धरून जावे. ह्याच गोष्टीला फार महत्व आहे. मग भले परमेश्वराला तुम्ही धूप, दिप, कापूर, नारळ, फुले, फळे काहीही अर्पण केले नाहीत तरी चालेल. कारण परमेश्वर धूप, दिप, नारळ फळांचा शौकिन नाही की आशिक नाही. त्याला फक्त भाव आणि भक्ति पाहिजे.

भावपूर्ण अंतःकरणाने तुम्ही परमेश्वराला भेटलेत तर तुमच्या दैनंदिन जीवनाला स्थैर्य आल्याशिवाय रहाणार नाही. आज काहीजण परमात्मा परमेश्वराची उपासना, भक्ति करीत असून सुद्धा दुःखी, कष्टी, अशक्त, दुबळे, रोगट, चिंताग्रस्त असतात. अशी माणसे आपणास का बरे आढळतात ? याचा आपण कधी मनाशी विचार केला आहे काय ? याचे मुख्य कारण त्यांचे मन परमेश्वराठायी एकरूप झालेले नसते. परमेश्वरा विषयी वेड आणि ओढ त्यांच्या अंतःकरणात नसतेचमुळी. म्हणूनच त्यांचे जीवन आनंदानी भरलेले नसते. आणि म्हणूनच त्यांना या नाविण्यपूर्ण जगाचा कंटाळा येतो.

जो परमेश्वराची मनापासून भक्ति करतो त्याचे जीवन चैतन्यानी भरून राहिल्याशिवाय रहात नाही. कारण मनापासून भक्ति करणाऱ्या भक्ताच्या पाठीशी परमेश्वर सदैव गुराख्यासारखा उभाच असतो हे अगदी सत्य सत्य आहे.

शेवटी जाता जाता सांगावेसे वाटते की परमेश्वर प्राप्तीसाठी उपास, तापास करावे लागत नाहीत. अथवा बूट, पॅन्ट, शर्ट टाय घालून शिरडी, पंढरपूरला जावे लागत नाही की कुठल्याही देव, देवतेला 'बोकडाचा बळी' द्यावा लागत नाही की कुठल्याही देवळात जाऊन नारळ फोडावे लागत नाहीत. तर मनापासून, एकचित्ताने भक्तीच करावी लागते. देवापर्यंत जाऊन पोहचण्याचा एकमेव खराखुरा मार्ग म्हणजे 'भक्ति' हीच एक शिडी देवापर्यंत माणसाला पोहचविते. देवापाशी जाऊ इच्छिणाऱ्यांनी याच एका मार्गाचा अवलंब करावा. याच शिडीच्या पायऱ्या चढाव्या. भाव धरूनच भक्ती करावी.

६ ऑगस्ट रोजीच्या पुण्यतिथी निमित्य 244

" सर्वांच्या हृदयात एकच ' तो ' आहे; बाबांनो, त्याचे समाधान होईल अशा समयज्ञतेने वागा. " असा सोपा संदेश देणारे

# श्री सिद्धारूढ स्वामी



प्रत्येक स्त्री-पुरुषाने सभोवार पसरलेल्या अंधकारातून वाट काढीत काढीत दिव्य प्रकाशाकडे कशा रीतीने जावे व स्वतःचे आणि इतरेजनांचे कल्याण कसे साधावे याचीच बहुमोल शिकवण त्यांच्या सन्निध जे जे झाले त्यांना श्री सिद्धारूढांनी दिली.

'मुत्या ! तू असा रडत का बसला आहेस ? तुला कसले दुःख झालेय ?'

'महाराज ! माझे सर्व काही ठीक आहे; परंतु दुःख एकाच गोष्टीचे होतेय. सर्व माणसे आपल्याजवळ येतात; आणि आपले दर्शन घेतात. कोणी कोणी आपणास आपल्या घरी नेऊन पूजाअर्चा करतात व नैवेद्य अर्पण करतात. मी मात्र पापी ! महार कुळात जन्म घेतल्यामुळे माझ्या वाट्यास ते भाग्य कुठले यायला ? मनात असूनही जवळून आपले दर्शन मला घेता येत नाही किंवा कोणत्याही प्रकारे आपली प्रत्यक्ष सेवाही करता येत नाही; यामुळे दुःखी कष्टी होऊन माझ्या कर्माला दोष देत मी रडतो आहे !'

मुत्या महाराचा तो प्रेमळ भक्तिभाव पाहून सिद्धारूढ स्वामींचे अंतःकरण द्रवले ! महाराज म्हणाले, 'एवढेच ना ? त्याची काळजी करू नकोस तू मुत्या ! तुझी इच्छा पूर्ण होईल; मग तर झाले ना ? उद्या दुपारी बारा वाजता मी तुझ्या घरी नैवेद्यास येईन;.

महाराजांनी याप्रमाणे आश्वासन दिले असले तरी त्यांची भक्तमंडळी त्यांना माझ्या घरी कसे येऊ देतील ? मुत्याला शंका येऊन तो तटस्थतेने त्यांच्याकडे पहातच राहिला.

'मुत्या तुला शंका आली, होय ? काही काळजी करू नकोस. मी बोललेले कदापि खोटे ठरणार नाही. तू घरी जा आणि तयारीस लाग !'

सिद्धारूढ स्वामींचे हे निर्धाराचे वचन ऐकून मुत्याचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यांना भक्तिभावाने वंदन करून हे आनंदाचे वृत्त आपल्या बायकोला सांगण्यासाठी तो धावतच घरी गेला.

परंतु बायकोचा काही केल्या मुत्याच्या सांगण्यावर विश्वास बसेना. आपल्या नवऱ्यास वेडबीड तर लागले नाही, अशीही शंका तिच्या मनात येऊन गेली, परंतु बायकोला काय वाटले याचा विचार करीत न बसता मुत्या आपले घर साफसूफ करण्याच्या उद्योगास लागला. महाराजांवर त्याची पूर्ण श्रद्धा होती. संतांचे वचन ते. ते का कधी खोटे होणार ? आपल्या बायकोलाही परोपरीने सांगून तिची त्याने खात्री पटवून दिली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच उठून या प्रेमळ पती-पत्नीने सडासंमार्जन करून आपले घर साफसूफ केले. रांगोळ्या घातल्या व पूजेची त्याचप्रमाणे नैवेद्याची यथा-

सांग तयारी केली व बारा वाजतात केव्हा आणि महाराजांचे पाय आपल्या झोपडीस लागतात केव्हा याची ते जोडपे मोठ्या उत्कंठेने वाट पहात बसले. काय तो त्यांचा आनंद !

महाराजांचा नित्यक्रम ठरलेला असे. सकाळी साडेअकरा वाजता भोजन करून ते बारा वाजता विश्रांतीसाठी शयनगृहात जात असत. आने रामप्पा व खंडे भिमाप्पा हे दोघे सेवेकरी त्यांच्याबरोबर नेहमी असावयाचे. महाराज आत गेले म्हणजे या दोघांनी दरवाजावर पहारा करीत बसावयाचे. महाराज जागे झाल्याची चाहूल लागली म्हणजे आत जाऊन त्यांच्या सेवेला हजर रहावयाचे.

अशा या कडेकोट बंदोबस्तात महाराजांनी ठरल्याप्रमाणे मुत्या महाराचे घर कसे गाठावयाचे ? परंतु सिद्ध पुरुषाला काय ? सिद्धीच्या बळावर अघटित घटना पार पाडण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी असते ! त्या सिद्धीच्या बळावर ठरल्याप्रमाणे ठरलेल्या वेळी महाराज मुत्या महाराच्या घरी गेले. मुत्याच्या व त्याच्या पत्नीच्या आनंदाला पारावार नव्हता. त्यांनी महाराजांचे पाय धुवून त्यांची भोळया भक्तिभावाने षोडशोपचारे पूजाअर्चा करून त्यांना नैवेद्य अर्पण केला व त्या प्रेमळ दंपतीसहवर्तमान महाराजांनी तो प्रेमाने ग्रहण केला.

भोजन संपल्यानंतर महाराज हात धुण्यासाठीं झोपडी बाहेर आले. त्याचवेळी सिध्या या नावाचा महाराजांचा एक भक्त भिक्षा मागून मठाकडे जात होता. त्याने महाराजांस पाहिले व त्याला आश्चर्याचा प्रचंड धक्का बसला. आपण हे काय दृश्य पहात आहोत ! आपले सिद्धारूढ महाराज आणि ते मुत्या महाराच्या घरी ? आपल्यदृष्टीवरील त्याचा विश्वास उडाला ! भलतेच कांही तरी ! असे घडणे कधी शक्य आहे ?

महाराज त्या दंपतीस आशीर्वाद देऊन स्वस्थानी निघून गेले होते.

सिध्याच्याने स्वस्थ रहावेना. खात्री करून घेण्यासाठी तो मुत्याच्या घरीं गेला व दूर उभा राहून मुत्याला हाक मारू लागला. मुत्याने खरे तेच त्याला सांगितले !

सिध्या क्रोधाने लालबुंद झालेला होता. तो तडक मठात गेला व सर्व भक्तमंडळीस जमवून आपण पाहिलेली व ऐकलेली सारी आश्चर्यकारक हकीगत त्यांना निवेदन केली.

' या सिध्याचे डोके तर फिरले नाही ! बेटा वाटेल ते बरळत सुटला आहे ! ' असे म्हणून भक्तमंडळींनी त्याला वेड्यात काढले. हातच्या कांकणास आरसा कशाला ?

चला आपण शयनमंदिरात जाऊन महाराज येथे आहेत की नाहीत व काय करताहेत ते तर पाहू या. आता सिध्यासह सर्व मंडळी लगबगीने शयनमंदिराकडे वळली. आणि तेथे पहातात तो काय ? महाराज खुशाल विश्रांती घेत पहुडले होते. आत बाहेर सर्वत्र सामसूम होते !

बिचारा सिध्या शेवटी खोटा ठरला !

दुसरा दिवस उजाडला. नित्याप्रमाणे मठाची सेवा करण्यासाठी मुत्या मठाबाहेर दाखल झाला. काही भक्तांना सिध्याने सांगितलेली घटना पडताळून पहावयाची होती त्यांच्या मनात एक प्रकारचे कुतूहल उत्पन्न झाले होते. भक्तमंडळी मुत्यासभोवार गोळा झाली व त्याला उलटसुलट प्रश्न विचारू लागले. प्रश्नांच्या त्या सरबत्तीने मुत्या महार गर्भगळित झाला ! त्याच्या तोंडावाटे शब्द बाहेर पडेना. तो दीनवाणा इकडे तिकडे बघू लागला. आता आपली धडगत नाही असे त्याला वाटले असावे.

त्याची ती करुणाजनक अवस्था पाहून भक्तमंडळीनी त्याला अभय दिले. 'मुत्या ! तू घाबरू नकोस. महाराज तुझ्या घरी आले होते का ? जे काय खरे असेल ते सांग ! तुला आम्ही मारणार नाही ! तुला मारायला आम्ही का वेडे आहोत ! '

आता मात्र मुत्याला धीर वाटू लागला. मुत्याने घडलेली सारी हकिगत अथपासून इतिपर्यंत सांगितली व हात जोडून क्षमेची याचना केली !

ती हकिगत ऐकून भक्तमंडळींच्या मनात चक्क प्रकाश पडला. सर्व भूतमात्रांच्या ठायी समभाव असावा, या महाराजांच्या शिकवणुकीची त्यांना जाणीव झाली. यात मुत्याला दोष का म्हणून द्यावयाचा ? या घटनेच्या रूपाने महाराजांनी भक्तजनांच्या मनात विचार क्रांति घडवून आणिली होती. आयुष्यातील हा एक अमोलिक धडा होता. यापुढे भक्तांनी तो अखंड गिरवायचा होता. मुत्याला सर्वांनी धन्यवाद दिले.

त्यानंतर मुत्या महाराला मठाचे द्वार कायमचे मोकळे झाले. तो मठात मोकळेपणी वावरू लागला !

संताना जातगोत काही नसते. 'सर्वांभूती समभाव ' ही त्यांची भावना असते व त्या शिकवणुकीचा प्रसार ते जनतेत आपल्या आचरणाने करीत असतात. सिध्दारूढ स्वामींच्या शिष्यात सर्व जातींचे व सर्व धर्मांचे लोक होते. सर्वांच्या उध्दारासाठी त्यांचा अवतार होता.

हैद्राबाद संस्थानमधील वंशदुर्गग्राम नावाच्या गावी ईश्वरभक्तिपरायण, सात्त्विक व आचरणाने अत्यंत पवित्र अशा कुळात सिध्दारूढांचा जन्म १८३७ साली झाला.

वीरभद्रस्वामी हे त्यांच्या मातापित्यांचे गुरु. या गुरुप्रसादानेच त्यांचा जन्म झालेला होता. बाळपणापासून त्यांच्या कानी कथाकीर्तन व ईश्वरभजन सतत करत असे. वीरभद्रस्वामींनी त्यांची योग्यता ओळखली होती. एकदा वीरभद्रस्वामी सांगत असलेले बसवेश्वर-पुराण ऐकत असता एका कठीण शब्दाचा त्यांनी त्यास अर्थ विचारला तेव्हा ‘ तो अर्थ ब्रह्मवेत्त्या गुरुकडून समजून घे, ’ असे त्यांनी उत्तर दिले.

यानंतर बालवयातच सिध्दारूढांना गुरुचा ध्यास लागला. गुरुशिवाय गति नाही असे त्यांच्या मनाने घेतले. मोठ्या कष्टाने आपल्या मातापित्यांचा निरोप घेऊन सिध्दारूढ गुरुच्या शोधार्थ बाहेर पडले.

गुरु का वाटेवर पडले आहेत ? गुरुभेट भाग्याशिवाय व योग्य ती वेळ आल्याशिवाय कशी घडणार ? ध्रुवबाळाच्या दृढ निश्चयाने सिध्दारूढ गुरुशोधार्थ बाहेर पडले होते. ध्येयसिध्दी झाल्याशिवाय त्यांचे थोडेच समाधान होणार होते ?

फिरत फिरत व ध्यानधारणा करीत ते शेवटी मल्लिकार्जुन क्षेत्रात आले. भगवंतानेच त्यांना तेथे आणले. तुमची निष्ठा प्रखर असली, तुमचे अंतःकरण तळमळू लागले म्हणजे भगवंतच तुमचा वाटाड्या होतो. मग तुमच्या भवितव्याची तुम्हाला काळजी वहावी लागत नाही. सिद्धारूढांचे तसेच झाले. ते त्या क्षेत्रातील कट्टी मठात गेले, गेले कसले ? भगवंतानेच त्यांना तेथे ओढून नेले ! तेथील मठाधिपति गजदंड स्वामी यांचे दर्शन घेऊन त्यांना त्यांनी दंडवत घातले ! हेच त्यांचे गुरु ! मठात गुरुजवळ राहून त्यांची सेवा त्यांनी निष्काम बुध्दीने व जीवाभावाने केली व ते गुरुकृपेस पात्र झाले. सद्गुरूच ते ! त्यांनी आपल्या या शिष्यवराची योग्यता ओळखली होती. एके दिवशी ते त्यांना म्हणाले, ‘ तुझी योग्यता थोर आहे. तू सहजसिध्द स्थितीत आरूढ झाला आहेस. म्हणून मी तुला ‘ सिध्दारूढ ’ हे नाव देतो. त्यानंतर काही दिवस गुरुसहवासात घालवून सिध्दारूढ हे तीर्थयात्रेसाठी बाहेर पडले.

तीर्थाटण करून आल्यानंतर सिध्दारूढ स्वामींनी आपल्या अवतारकार्यासाठी कर्नाटक प्रांतातील हुबळी हे स्थान मुक्रर केले. त्यांचा शिष्यसंप्रदाय कर्नाटक, महाराष्ट्र वगैरे अनेक राज्यातून पसरलेला आहे. ते आपल्या भक्तांना नामस्मरणाचा उपदेश करीत असत. जसा ज्याचा अधिकार असेल तसा त्याला मंत्र देण्याचा व त्याच्या उध्दाराचा मार्ग दाखविण्याचा त्यांचा नित्यक्रम असे. सर्वांभूती समभाव स्वतः आचरणात आणून, इतरास तो धडा गिरविण्यास ते लावीत असत. त्यांना उच्चनीच भाव मुळीच आवडत नसे. पंक्तिप्रपंच किंवा आपणास एक व इतरास दुसरे, त्यांना केव्हाही खपत नसे. जे काही असेल ते सर्वांनी समभावाने गोड करून खावयाचे.

१९२१ सालची गोष्ट. मुंबईत रहाणारे महाराजांचे एक भक्त आपल्या मुलीसह हुबळी येथे त्यांच्या दर्शनासाठी गेले होते. मठात साधु-संतांच्या, अतिथि-अभ्यागतांचा फार मोठा जमाव नेहमी असे. गोरगरीबास किंवा जे कोणी आले असतील त्यांना अन्नसंतर्पण होत असे. मुंबईहून भेटीसाठी गेलेले भक्त एकदा महाराजांपाशी जाऊन म्हणाले 'महाराज! येथील साधुसंतांना व इतर मंडळींना भोजन घालण्याची माझी इच्छा आहे. आपली परवानगी असावी.' महाराजांनी रुकार देताच त्या भक्ताने दुसऱ्याच दिवशी तो योग जुळवून आणला. त्यांनी महाराज व त्यांचे निकटवर्ती अकरा थोर भक्त मिळून बाराजणांसाठी पक्वानांचा वेगळा बेत व इतरांस भात आणि मुगाची आमटी असा स्वयंपाक तयार करण्यास सांगितले.

दुसऱ्या दिवशी बारा वाजता जेवण तयार होताच भक्ताने महाराजांस भोजनास येण्याची विनंती केली. महाराजांसह बाराजणांची पूजा करण्यात आल्यानंतर त्यांच्यासाठी वाढून तयार असलेल्या पक्वान्नांच्या ताटावर त्यांना नेऊन बसविण्यात आले. इतर भात आमटीवाटी मंडळीही आपापल्या पाटावर बसली.

महाराजांनी चौफेर नजर टाकली तेव्हा भोजनात 'पंक्तीप्रपंच' दिसून आला! त्यांना तो 'प्रपंच' असह्य झाला! ते पक्वान्नाचे भोजन त्यांना गोड कसे लागावे! 'उठा!' या एकाच शब्दात त्यांनी आपले हृदय खुले केले!

भोजनास हात न लावता सर्व मंडळी पटापट उठली! हा देखावा पाहून त्या भक्ताला काय वाटले असेल हे का वेगळे सांगायला हवे! तो अत्यंत खजील झाला. एवढेच नव्हे तर पश्चात्तापाने रडू लागला! त्याने महाराजांचे पाय धरले व या अपराधाबद्दल क्षमा करण्याची याचना करू लागला. त्यावेळी महाराजांनी त्याला अभय देऊन, असा पंक्तीप्रपंच कधीही करू नये; सर्वांच्या अंतःकरणात एकच परमात्मा आहे. त्याला समाधान होईल अशा समयज्ञतेने वागावे. याप्रमाणे उपदेश करून नंतर सर्वांनी मिळून एकाच प्रकारचे भोजन केले.

अन्नसंतर्पण करण्यात महापुण्य आहे असे महाराज नेहमी सांगत असत व हुबळी मठात ते एकाकाळी फार मोठ्या प्रमाणावर होत असे. अजूनही तेथे मोठमोठाल्या चुली व अन्न शिजविण्याची मोठमोठाली भांडी व पाकशाळा पहायला मिळतात. समाधिस्थ होण्यापूर्वी तीन वर्षे म्हणजे १९२६ साली महाराज आपल्या आपल्या भक्तांना जवळ बोलावून म्हणाले होते, 'अन्नसंतर्पण करण्याची संधि सहसा वाया दवडू नये. सध्याची संधि त्या कार्यास अनुकूल आहे. ती दवडू नका. पुढे एक

काळ असा यावयाचा आहे की, येथील पाकशाळेत तुम्ही मोठमोठाल्या चुली घातल्या आहेत त्या खणून काढाव्या लागतील. कारण अन्नसंतर्पण करणे पुढे अशक्य होणार आहे. तुम्हालाच पोटभर अन्न खायला मिळणार नाही; मग तुम्ही इतरास काय देणार ?'

आणि तदनंतरच्या काळात त्यांची ही भविष्यवाणी तंतोतंत खरी ठरलेली आजही आपण पहात आहोत !

आपल्या भक्तकाजासाठी सिध्दारूढ काय वाटेल ते करायला तयार असत. आपल्या भक्तांना कोणत्याही प्रकारचे दुःख होऊ नये यासाठी ते जपत असत. संत भक्तीचे भुकेले असतात. देव आणि संत यामध्ये फरक तो कसला ? जी देवाची आवड व जी देवाची दृष्टि; ती संतांची आवड व संतांची दृष्टि !

हुबळी येथे प्रती वर्षी माघ मासात सिध्दारूढ मठात फार मोठा उत्सव होतो व असंख्य भक्त मोठ्या भक्तिभावाने हुबळी येथे जमतात व सिध्दारूढ महाराजांचा जयघोष करतात. अशा उत्सव प्रसंगी सिद्धारूढ महाराजास पालखीत बसवून भक्त मंडळी त्यांना मठापासून तीन मैलावर असलेल्या जडीप्पाचे मठात घेऊन जात असत. महाराज तीर्थयात्रा करीत असता जटाधारी जडीप्पा त्यांना गोकर्ण क्षेत्रात भेटला. त्यावेळेपासून महाराजांचा भक्त होऊन तो हुबळीतील एका मठात रहात असे. त्या मठात महाराजांचे पूजन अर्चन होऊन परत येताना जडीप्पासह पालखीत बसून महाराज येत असत. परत येताना दुपारचे कडकडीत उन्ह लागत असे. अनवाणी परत येताना भक्तमंडळींचे पाय अर्थात्च भाजून जावयाचे; परंतु तसे काही होत नसे. एकदा मिरवणुकीनंतर दुसऱ्या दिवशी सकाळी पुराण सांगण्यासाठी बसले असता महाराजांनी विठ्ठलराव नावाच्या आपल्या भक्तास 'विठ्ठला ! विठ्ठला !! म्हणून मोठ्याने हाका मारायला सुरुवात केली.

विठ्ठलराव येताच त्यांना ते म्हणाले, 'माझ्या पायाला उन्हातून अनवाणी फिरल्यामुळे फोड बघ कसे आले आहेत ! भक्तमंडळी पालखीतून मिरविली व मी आपला उन्हा-तान्हातून चालत होतो ! थोडं तेल तरी घेऊन ये !'

सिद्धारूढ महाराजांच्या आयुष्यातील असे भक्तांचे दुःख स्वतःवर ओढवून घेऊन त्यांना दुःख मुक्त केल्याचे दाखले किती तरी सांगता येण्यासारखे आहेत.

प्रत्येक मनुष्याने दुर्गुणास यत्किंचित् थारा न देता सद्गुणी होण्यासाठी झटावे व आपले कल्याण साधावे. दया, क्षमा, शांति, धैर्य—हे पृथ्वीमोलाचे सद्गुण

आहेत. यापैकी एक तरी सद्गुण मी माझ्या अंगी बाणवीनच बाणवीन असा निर्धार करून प्रत्येक मनुष्याने तो आचरणात आणण्यासाठी झटावे. त्यातूनच कल्याणाचा व उद्धाराचा मार्ग सापडेल. एक सद्गुण पूर्णत्वाने अंगी बाणला म्हणजे त्याच्याबरोबर इतर सद्गुणांचीही जोड आपणास लाभेल असे सिध्दारूढ महाराजांचे आपल्या भक्तास सांगणे असे. नामस्मरणावर महाराजांचा फार भर असे. नामस्मरणाने शुध्दि होते व चित्ताची एकाग्रता साध्य करता येते. अतीथि अभ्यागतांना अन्न देऊन त्यांचा आत्मा संतुष्ट करणे हे महापुण्य आहे, असे ते सांगत असत. सत्शास्त्रप्रवण; निस्सीम गुरुसेवा व मनपूर्वक नामस्मरण ही आपले शाश्वत कल्याण साध्य करून घेण्याची साधने आहेत; ती प्रत्येक भक्ताने हस्तगत करून आचरणात आणण्यासाठी सतत झटावे, असे त्यांचे कळकळीचे सांगणे असे. त्यांच्या मागे त्यांचा शिष्यसांप्रदायही हेच कार्य यथाशक्ति पार पाडीत आहे. —साईनंद

## साईनिकेतनमधील गुरुपौर्णिमा

दरवर्षी प्रमाणे साईनिकेतन दादर येथे गुरुपौर्णिमेचा उत्सव साजरा केला गेला. दुपारी १२ वा. श्रींची आरती झाली.

त्यापूर्वी अंबरनाथचे गायक श्री. प्रकाशभाई मल्होत्रा व त्यांच्या कन्या यांचा साईगीतांचा सुंदर कार्यक्रम झाला.

## कन्या ज्ञानेशाची गोपी कृष्णाची

# श्री संत गुलाबराव महाराज



श्रीसंत गुलाबराव महाराज

वऱ्हाडात उमरावतीच्या उत्तरेला २३ मैलांवर एलिचपूर तालुक्यात माधान नावाचे एक खेडेगाव आहे. येथील शिवोपासक–विष्णुभक्त राणोजीराव पाटील यांना चार पुत्र होते. रघुजी, बाकारामजी, नरसाभाऊ व गोंदुजी. गोंदुजी यांची प्रथम पत्नी सौ. अकोलाबाई यांच्या पोटी, शके १८०३ मध्ये वृषभनाम संवत्सरात आषाढ (शुद्ध) दशमीस लोणी टाकळी येथे (त्यांच्या माहेरी) श्री गुलाबराव महाराजांचा जन्म

झाला. हे छोटेसे खेडे अमरावतीच्या दक्षिणेला १३ मैलांवर आहे. तेथील श्री विठोबा सवाई हे महाराजांचे आजोबा व सौ. सावित्रीनानी ह्या त्यांची आजी होत.

पाणीदार टपोरे डोळे, सरळ नासिका, पुष्ट व गुटगुटीत गोंडस शरीर व सांवळा वर्ण यामुळे यांची बालमूर्ती लोभस व मनोहारी दिसत असे. पण अवघ्या तीनच महिन्यांनी डोळे आले असता एका अनभिज्ञ दायादाच्या अघोरी उपायाने या गोंडस बाल मूर्तीला संपूर्ण अंधत्व आले नि पाणीदार सुंदर डोळयांची वाट लागली.

लहानपणापासूनच महाराज अंध व अलौकिक बुद्धिमान होते, पण तरीसुद्धा बालपणी त्यांच्यात अवास्तव गांभीर्य आले नव्हते. सर्वसामान्य बालकांप्रमाणेच यांचे बालपण अल्लडपणात व हूडपणा करण्यात गेले. बोलता येऊ लागण्याच्या पूर्वीपासूनच ते मान व हात हालवून तर कधी टाळया पिटून खेळत; कधी चुटक्या वाजवीत चक्राकार फिरत; कधी मोठ्याने तोंडातून आवाज काढीत. असे ते स्वच्छंदी व विनोदी वृत्तीचे होते. त्यांचा चेहरा निर्मल व सतेज असल्याने ते नेहमी हंसतमुख व आनंदी दिसत.

अशी त्यांची बालपणीची चार वर्षे मातृसुखात गेली. पण आई बाळंतरोगाने मृत्युमुखी पडून त्यांचे मातृछत्र हरपले. तेव्हापासून श्री गुलाबराव महाराजांचा बालपणीचा बहुतेक काल लोणी टाकळीला सौ. सावित्रीनानीच्या प्रेमछत्राखाली गेला. ते तिला बाई म्हणत. बाईंचे यांच्यावर अलोट प्रेम होते. आईविना पोर म्हणून त्या यांना विशेष जपत. लाडाने त्या यांना गुल्या म्हणत. यांचे कोड पुरवीत. यानाही आजीचा ळळा लागला. बाई म्हणजे यांना सुखसर्वस्व वाटे. रोज बाईंचे जेवण झाल्यावर चंदनाच्या खोडाने ते तिच्या पोटऱ्या ठोकत. पोटऱ्या दुखायच्या थांबून आजीला बरे वाटे. महाराज नेहमी तिच्याजवळ भातके मागत, भूकतहान तिला सांगत; हट्ट, लडिवाळपणा सर्व तिच्याजवळ करीत. यांच्या बाजीराव नावाच्या मामाला मात्र असे यांचे लाड केलेले आवडत नसे. घरातील इतरांनाही यांच्याविषयी विशेष प्रेम नव्हते.

एकदा काय झाले. सखाराम मामाच्या पत्नीच्या स्वच्छ सफेत सातरीवर महाराज बसले. तेव्हा श्रीमंताघरची ती लेक म्हणाली, 'गुलाबराव, सातरीवर बसू नका. जवळच्या चिमणीला हात लागून ती पडेल व सातरी पेटेल.' बाई यांची कड घेऊन लगेच म्हणाली, 'याच्या अंगचा मळ तुझ्या अंथरुणाला डिकते काय? अंथरुण झिजते काय? बस रे गुल्या.'

गुलाबराव सातरीवर बसून हात हालवू लागले. नेमका चिमणीला हाताचा धक्का लागून चिमणी पडली व सातरी पेटली. मामीचे लुगडेही पेटले. महाराज म्हणाले,

'मी नाही पाडली, तिचाच धक्का लागला असेल. मला मारू नको. तिचे अंथरुण जळत नाही. कपडे जळणार नाहीत. तेल जळेल.' महाराजांचे बोल खरे ठरले. तर सांगायचा मुद्दा असा की, महाराजांना बाह्यदृष्टी नसली तरी लहानपणापासूनच त्यांना अंतरदृष्टी लाभली होती.

त्यांच्या बालवयातील अंतरज्ञानाचे आणखी कितीतरी प्रसंग सांगता येण्यासारखे आहेत. कोणाला मुलगा होणार की मुलगी होणार, ते महाराज बरोबर सांगत. त्यांच्या बाजीराव मामाने दुसरी बायको केली तेव्हा ते म्हणाले, 'हिच्या जोडव्याचा आवाज बरा नाही; ही विधवा होणार.' पुढे तसेच घडले. एकदा म्हणाले, 'माझं लग्न करू नका. लग्नात मोठा पाऊस, वारा येईल.' पुढे त्यांच्या लग्नात अगदी तसेच घडले. एकदा एकाला म्हणाले, 'लग्नाहून येताना तुला सर्प डसेल व तू मरशील.' बाई रागावून म्हणाली, 'तू बोलतोस तसं होते. लोक तुला बोव्हारा (काळजिभ्या) म्हणतात. आजीच्या लाडानं वाया गेला म्हणतात.' महाराज म्हणाले, 'मला दिसते तसे मी बोलतो. मी काही द्वेषानं बोलत नाही.'

अंधाची श्रवणशक्ती व स्पर्शज्ञान डोळसाहून अधिक असते. याचे कारण त्या शक्तीचा त्यांना जास्त उपयोग करावा लागतो, व त्यामुळे त्यांचे मन तिकडेच जास्त केन्द्रित होते. बुद्धिमान गुलाबरावांची श्रवणशक्ति व स्पर्शज्ञान तर विशेषच होते. एखाद्या डोळस माणसाप्रमाणे लहानपणी ते अल्लडपणे कुठेही धावायचे. आजी काळजीने म्हणायची, 'अरे बाबा, डोयाले दिसत नाही, धावू नको. पडशील ना रे! डाव्या हातानं होत जाय. उजव्या हातानं (बाजूने) विहिरीत पडशील.' पण तिचे न ऐकता मुद्दामच मिस्किलपणे ते विहिरीजवळ जात व तिच्या बोलण्याची नक्कल करीत 'इहिरीत पडशील, तर मरशील ना रे गुल्ल्या! लेका डाव्या हातानं जा.' शेजारपाजारच्या बाया पाण्याला गुपचूप आल्या तरी नुसत्या जोडवी व बांगड्यांच्या नादातील निरनिराळ्या फरकावरून ते त्यांची नावे पटापट सांगत.

सहा वर्षे पर्यंतच्या आपल्या आजोळीच्या वास्तव्यात महाराज नाना प्रकारच्या बाललीलात रमून गेले होते. कधी घरात खाऊ असला, तर मडक्यावर खडा मारून काढून खात. कधी तोरस्यांची रोपे, बाभळींचा पाला, मातीची ढेकळे वगैरे जमवून सवंगड्यासह बाजाराचा खेळ खेळत. एखादे वेळी लहान लहान नांगरवखर, लोखंडाची लहानशी पास, लाकडाचे बैल, जू वगैरे सामान जमवून शेतकीचा खेळ खेळत व बालमित्रांना शेतकीची माहिती सांगत. भूक लागली म्हणजे बाईकडे 'पुलावा' मागत. पुलावा म्हणजे पापुद्रा काढलेल्या भाकरीवर तेलमीठ घालून त्याचे मुटकुळे करून खाणे

इतराना हा 'पुलावा' प्रकार माहीत नसल्याने ती मुले आपल्या घरी 'पुलावा' मिळव नाही म्हणून रडत असत.

पुढे ६ व्या वर्षानंतर महाराज माधानास राहावयास आल्यावर तिथे भिंगरी, कोयाळ इत्यादी पुरुषांचे खेळ व फुगड्या, झिम्मा, पिंगा इत्यादी मुलींचे खेळ पण खेळत. त्यांच्याबरोबर फुगडी, पिंगा खेळताना इतरांची दमछाक होत असे, पण महाराज दमत नसत. कधी कधी एका गंजात पाणी घालून व त्या पाण्यात पेरकुंड घालून त्याचे सुस्वर वाद्य करीत. तर कधी, हातात कामट्यांचे धनुष्य घेऊन 'राम लक्ष्मण आले, युद्ध करतो' असे म्हणत, बाण सोडीत. दोन्ही हातानी चुटक्या वाजवीत आपल्या सभोवती गरगर फिरत. चक्राकार फिरण्याची तर त्यांची नेहमीचीच करमणूक होती.

मात्र बालपणीचा सारा वेळ काही त्यांनी दंगामस्ती व व्रात्यपणा करण्यात घालविला नाही. लहानपणापासून त्यांची ईश्वरावर नितांत भक्ती होती. विशेषतः कृष्णावतारावर त्यांचे अलोट प्रेम होते. ज्ञानेश्वर महाराज हे तात, श्रीकृष्ण हे पती व आपण गोपी अशी यांची 'मधुरा' भक्ती होती. त्यांच्या घरची व आजोळची माणसे महानुभावी पंथाची होती, पण त्या पंथाची विचारसरणी त्यांच्या बुद्धीला पटत नसे. ते आजीला म्हणत, 'बाई तू मानभावाचा मंत्र सोडून दे.' त्यांची उपजत प्रवृत्ती वैदिक धर्माकडे होती. पोथी, पुराणे ऐकणे, पाळणे, आरत्या, स्तवने वगैरे म्हणणे इत्यादींत त्यांचे मन रमत असे.

सातव्या वर्षी माधानास आल्यावर त्यांची ईश्वरभक्ती अधिकच वाढली. ते दगडावर दगड रचून त्यांना वैकुंठ व कैलास म्हणत. सर्वांत वरचा दगड तो महादेव. त्यावर पाणी टाकून तो लोट आपल्या अंगावर घेत व गंगा आली म्हणत. कित्येकदा तर प्रहर प्रहर पूजा करीत असत. एकादशी, सोमवार, जन्माष्टमी वगैरे उपवास करीत. रात्री निजानीज झाल्यावर श्वास बंद करून बराच वेळ समाधि लावून बसत. त्यांची शिवभक्ती व कृष्णभक्ती पाहून लोक हा राणोजीच परत जन्मास आला असे म्हणत.

श्री गुलाबराव महाराज एकपाठी होते. शिवलीलामृत, व्यंकटेशस्तोत्र, मंगलाष्टके वगैरे कित्येक धार्मिक ग्रंथ त्यांना तोंडपाठ होते. वेदांतापासून बायकांच्या कहाण्या, सामगायन, शाहीरांची डफगाणी या सर्वांत ते रमत असत. स्वतःही ते ग्रंथलेखन करीत. त्यांच्यात अद्भुत काव्यशक्ती होती.

पुढे, पुढे त्यांनी कुराणाचाही अभ्यास केला होता. इतकेच नव्हे तर प्लेटो, सॉक्रेटिस, डिसकार्टेस, कॅट, हेगेल, स्पेन्सर, मिल्ल इत्यादी अनेक पाश्चात्य तत्त्व-

ज्ञान्यांच्या ग्रंथांचा अभ्यास करून त्यावर वादविवाद विवेचन करीत आणि खरे आत्मज्ञान प्राप्त झालेले महात्मे भारतखंडातच जन्मास आले असा त्यांनी निष्कर्ष काढला होता. त्यांचे चरित्र, काव्य व निरूपण वाचल्यानंतर त्यांच्या बुद्धीचा आवाका पाहिला म्हणजे समजून येते की महाराजांची केवळ स्मरणशक्तीच दांडगी होती असे नव्हे, तर याजबरोबर त्यांच्या बुद्धीची धारणाशक्ती, आकलनशक्ती, विचारशक्ती, प्रतिभाशक्ती तसेच चिंतन, मनन, प्रगटीकरण या सर्व शक्ती परिणतावस्थेला पोचलेल्या होत्या.

श्री गुलाबराव महाराजांचा विवाह दत्तापूर येथील गणाजी भुयार यांच्या पूर्णा नावाच्या वडील मुलीशी शके १८१४ फाल्गुन वद्य ५ स झाला. त्यांन्या पत्नीचे नाव मनकर्णिका. त्यांना पुढे अनंतराव नावाचा मुलगा झाला. मनकर्णिकाबाईने विवाहानंतर १३ वर्षांनी श्रावण वद्य शके १८२७ मधे देह ठेवला. ( १९०७ )

श्री गुलाबराव महाराजांना ज्ञानेश्वर (शके १८२४) आणि श्रीकृष्ण यांचा साक्षात्कार झाला होता. महाराज ज्ञानेश्वरांना पिता, माता आणि श्रीकृष्णाला पती मानून माधुर्य भावात भक्ती करीत. श्रीमहाराजांनी संप्रदाय रक्षणासाठी भक्तीप्रधान संप्रदाय सुरतरू, प्रेमनिकुंज, भक्तिप्रदतीर्थामृतादि योगग्रंथ, संगीतग्रंथ, आयुर्वेदग्रंथ, भक्तिग्रंथ, शास्त्रग्रंथ, सांख्यग्रंथ, गाथाग्रंथ, निबंधग्रंथ इ. १३० ग्रंथपुष्पांची मालिका वाचकांना दिली आहे. त्यात पाश्चात्य व पौर्वात्य यांच्या ग्रंथातील सप्रमाण विवेचन असून शिवाय त्यांच्या मधुराईत ज्ञानोत्तर, प्रेमभक्ती, भागवत संप्रदाय इ. चे मंडन केलेले आहे. अनेक थोर पंडित विद्वान त्यांचेशी विविध चर्चा करीत असत.

पण कुशाग्र बुद्धिमत्तेचा मनुष्य लोककल्याणाच्या गोष्टी करतोच असे नाही. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे महाराज आपल्या मातेप्रमाणेच सुशील व सद्‌गुणी होते. मनाचा सरळपणा, अतिंद्रियज्ञान नीतिधैर्य वगैरे दैवी गुण त्यांच्यात होते. देव अंगात येण्याचे खोटे प्रकार उजेडात आणणे, ढोंगी लोकांचे ढोंग उघड करणे, अडाणी लोकांना सदुपदेश करून त्यांना सुधारण्याचा प्रयत्न करणे, स्वतः त्याप्रमाणे वागणे, आस्तिक नास्तिकाशी वादविवाद करण्यास तयार असणे, यातच त्यांनी आपले लहानपणापासूनचे आयुष्य वेचले. असाधारण बुध्दिमत्ता, सद्‌गुणी स्वभाव, सत्प्रवृत्ती व सर्वांचे भले व्हावे ही इच्छा, या सर्वांचा समन्वय साधल्यामुळेच, 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' या थोर पदाला श्री गुलाबराव महाराज पोहोचले होते. श्री गुलाबराव महाराज इ. स. १९१५ सालच्या भाद्रपद शुध्द १२ ( २० सप्टेंबर १९१५ ) अगदी सूर्योदयासमयी पुण्यात वैकुंठवासी झाले. त्यांना कोटी कोटी प्रणाम. □

# श्रीसाई बाबांची कृपा

—श्री. यशवंत गणपत वगळ
४ अ/१६७ भक्तीयोग सोसायटी
वझिरा नाका बोरीवली ( प. ) मुंबई ९२

● माझा कनिष्ट चि. विवेक याने श्री साईबाबांची एक फोटोफ्रेम आणली आहे. रोज सकाळी उठल्याबरोबर आंघोळ करून तो श्री साईबाबा पोथी वाचतो. तसेच रात्री झोपताना श्री साईबाबांना नमस्कार करून झोपी जातो. तो 'साईलीला' या मासिकाचा सभासद आहे आमच्याकडे हे मासिक आले म्हणजे मी मुख्यत्वेकरून लोकांचे साईबाबा विषयी आलेले अनुभव वाचीत असतो व आपल्या सुद्धा एखाद्या अनुभवाची प्रचिती यावी अशी मनात इच्छा बाळगीत असे. माझे एक वर्षापूर्वी स्वरयंत्राचे ऑपरेशन झाले आहे, त्यामुळे मला बोलता येत नाही. अमेरिकेत वाचा बंद झालेल्या रुग्णासाठी आवाज देणारे उपकरण मिळते व ते मिळविण्यासाठी मी माझ्या मित्रमंडळीना विचारणा केली परंतु मला प्रतिसाद मिळाला नाही. जानेवारी १९८२ चे साईलिला मासिक वाचीत असताना माझे लक्ष श्रीसाईबाबांच्या प्रतिमेकडे गेले व माझ्या माझ्या मनात बोलण्याचे उपकरण मिळावे हे गुपीत, एकटक लावून त्यांनी सांगितले. मला जर यश आले तर मी 'साईलीला' या मासिकात माझा अनुभव या सदराखाली प्रकाशित करण्यास देईन. ता. २५–१–८२ रोजी महाराष्ट्र टाईम्स मध्ये जपानची मदत अशी बातमी वाचली आणि ५०० उपकरणे जपानच्या क्यो· सायकाम ट्रस्टने इंडिया कॅन्सर सोसायटीच्या कॅन्सर रीहॅबिली टेशन सेन्टरला समारंभ पूर्वक दिली. या उपकरणामुळे आपले विचार बोलून दाखविणे शक्य होईल. ही आलेली बातमी माझे शेजारी श्री. एम. के. जोशी यांनी माझा द्वितीय मुलगा राजन् याला सांगितली व हे उपकरण मिळविण्याचा प्रयत्न करावा म्हणजे बाबांना बोलता येईल. मी लगेच या बातमीचा संदर्भ देऊन वरिल निर्देश केलेल्या सेंटरचे मुख्य अधिकारी मेजर जोगळेकर यांच्याकडे उपकरण मिळविण्यासाठी अर्ज सादर केला. माझे स्नेही श्री. जयवंत केरोबा वडके ॲडव्होकेट यांनी सुद्धा मला उपकरण मिळण्याबाबत मेजर जोगळेकर यांना शिफारस पत्र पाठविले. मला मेजर जोगळेकर यांनी बुधवार रोजी बोलाविले त्याप्रमाणे माझा जेष्ट चिरंजीव प्रकाश यांजबरोबर तेथे गेलो व मला उपकरण देण्यात आले व त्याविषयी सर्व माहिती उपलब्ध केली, या उपकरणाने स्वाभाविक बोल काढणे त्रासदायक आहे. परंतु सतत प्रयत्नाने बोलता येईल असे वाटते. थोडक्यात सांगणे म्हणजे साईबाबांची माझ्यावरिल कृपेचा आनंद अतिशय झाला व अशीच आम्हांवर श्री साईबाबांची कृपा रहावी हिच बाबांच्या चरणी प्रार्थना!

२५१

# भक्ती : आनंदाची ती चित्कळा

—प्रा. र. श्री. पुजारी
रमानिवास, ९९२ सदाशिव पेठ,
पुणे-३०

● पडीक जमीन आणि मशागत केलेली शेतजमीन यात फार फरक आहे. पडीक जमिनीत काटेरी झाडझुडपांचे रान माजते. मशागत केलेल्या जमिनीत अन्न-धान्य, फळभाज्या, फुलभाज्या, ऊस, द्राक्षे, अंजीर अशी पिके होतात.

काही कारणास्तव काही माणसे अशीच एखाद्या देवाच्या किंवा बुवाच्या नादी लागतात. त्या देवतेला प्रसन्न करण्यासाठी हरतऱ्हेचे उपाय योजितात. आमिषेही दाखवितात. शेवटी ते मनोगत पुरे झाले की गरज सरो या न्यायाने तिकडे ढुंकूनही पाहात नाहीत. पडीक मनात उगवून आलेली भक्ती ही या प्रकारची असते.

आपल्या क्षुद्र स्वार्थांच्या प्राप्तीसाठी देवाशी केलेली लबाडीची ही सौदेबाजी देव मिश्किलपणे पाहात असतो. चॉकलेटचे आमिष दाखवून छोट्या मुलाला शाळेत रुळवावे लागते हे तोही जाणत असतो. त्यामुळेच अशा भक्तांची काम्येही तो पुरी करीत असतो. तथापि या चॉकलेटच्या गोडीपेक्षा शाळेची गोडी या मुलाला कशी लागेल इकडेच त्याचे सर्व लक्ष असते. चॉकलेटशिवाय ज्या दिवशी मूल शाळेत रमले तो दिवस आपल्या गुप्त नोंदवहीत त्या रात्री देव सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवतो.

वैराग्याशिवाय ज्ञान नाही आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नाही हे देव जाणत असतो. म्हणूनच तो आधी भक्तांच्या वासनांची तृप्ती करून त्याना शांत करतो. शाळेतील अभ्यासात गुंग झालेले मूल, चॉकलेट आपल्या खिशात ठेवून देईल व घरी गेल्या-नंतर ते सावकाशपणे खाण्याचा विचार करील, त्याप्रमाणे क्षुद्र काम्ये तो हळूहळू क्षीण करतो आणि भक्तास खऱ्या भक्तीस लावतो.

खरे ज्ञान पॅकिंग केलेल्या आंब्यांच्या किंवा द्राक्षांच्या पेटीप्रमाणे आपल्या घरी कधीच येत नाही. भिन्न भिन्न मूल्यांच्या संघर्षातून निर्माण होणाऱ्या स्फुलिंगाप्रमाणे ते निर्माण होते आणि आपल्या हृदयास हळूहळू प्रकाशमान करते. सच्चरितातील विविध विलक्षण घटना, प्रसंग आणि व्यक्ती यांचा जसजसा विचार करीत जावे तस-तसे ध्यानी येते की भक्तांचे अंधारलेले अंतःकरण प्रकाशमान करण्यासाठीच श्री

साईंनी हे संघर्ष–प्रसंग त्या त्या भक्ताच्या प्रगतीचा मगदूर ध्यानी घेऊन त्या त्या स्थल-कल-परिस्थितीनुसार निर्मिलेले आहेत. फार काय, नव्यानेच शिरडीस गेलेल्या भक्तांबाबतही असेच संघर्ष प्रसंग अनुभवाच्या रूपाने निर्माण करून श्रीसाई आजही भक्तांना पूर्वीप्रमाणेच घडवीत आहेत.

अनुभवी आणि चतुर गुरूची हातोटी अशी असते की बोलता बोलता सहज-पणेच आपली ज्ञान-मूल्ये शिष्याच्या पोटी तो उतरवील आणि ज्ञानामुळे शिष्यास आत्मविश्वास येताच शिष्याचे शिष्यत्व पत्करल्याप्रमाणे गुरूच शिष्याला परिप्रश्न करील! श्रीसाईंची नम्रता, आर्जवशक्ती आणि भक्तप्रेम ध्यानी घेता एक महत्वाची गोष्ट ध्यानी येते ती अशी की भक्तांच्या मनात केवळ ज्ञान-भक्ती-वैराग्याचे बीज पेरण्याचेच व्रत श्रीसाईंनी घेतले नाही, तर त्या मूळ पडीक जमिनीची मशागत कर-ण्याचे व्रतही त्यानी घेतले!

जमिनीतील तण उपटून काढणे, दगडगोटे वेचणे, जमिनीची चांगली नांगरणी करणे या कामी भक्तास श्रीसाई पुढे पुढे अशा रीतीने राबवतील की भक्तांस साई-नामाबरोबर डोळयातून टिपे गाळण्याविना अन्य शब्दही उरणार नाही.

केवळ पोथ्यापुराणे वाचून शब्दज्ञानाने नागविला गेलेला भक्त जेव्हा स्वतःच्याच अंतःकरणातील अहंकाराचे तण उपटू लागेल, विद्वत्तेमुळे बेगडी बनलेल्या मतमतांत-रांचे दगडगोटे वेचून दूरवर फेकून देऊ लागेल. मन मुळापासून खणून त्यातील कुवा-सनांची सर्पस्थाने कायमची उध्वस्त करू लागेल तेव्हाच श्रीसाई अंतःकरणाच्या बांधा-वर उभे राहून त्याला म्हणतील, 'शाब्बास! तू माझा खरा भक्त आता झालास!'

वेठबिगारीचे काम आणि खऱ्या प्रेमाने केलेले काम यात जमिन–अस्मानाचा फरक आहे. प्रेमाने अर्पण केलेले पानफूल, प्रेमाने केलेले दास्य, प्रभुप्रेमाने गायिलेले गीत, खरे सेवेकारणी लागले. अन्यथा तो सर्व देखावाच झाला.

रखरखीत माळावर उभा असणारा वटवृक्ष उन्हाळ्यातही हिरव्यागार पर्णराजीने पांथाना शीतल छाया निर्माण करतो, याचे श्रेय पृथ्वीच्या पोटी खोलवर वहाणाऱ्या व तेथून त्या वृक्षाचे मुळांच्या द्वारे पोषण करणाऱ्या पृथ्वीच्या प्रेमशक्तीस आहे. भक्तीचा मूळाधार ही प्रेमशक्तीच आहे. तिची वाढ भक्तांच्या अंतरंगात जेवढी अखंड होत राहील तेवढ्या प्रमाणात भक्तीचे पोषण होईल.

अध्यात्मक्षेत्रातच नव्हे तर व्यवहारातही 'जेवढी भक्ती तेवढीच प्राप्ती' हे तत्व मार्गदर्शक असल्यामुळे व्यवहार जितका परस्पर प्रेमावर अवलंबून असेल तितका तो

आनंदाचा होईल. साहजिकच या प्रेमाने जेथे भक्तीची अत्युच्च पायरी गाठली, तेथे भक्तीही अभेदरुपच झाली. पर्यायाने व्यवहारात निर्माण झालेले शेकडो प्रश्नही जागीच थंड झाले.

भक्तीचे पीक काही महिन्यात येणाऱ्या हंगामी पिकाप्रमाणे नगदी पीक नव्हे. ऐहिकाची लयलूट करणारे हे पीक नव्हे. उत्तम ऐहिक लाभो वा न लाभो भक्ती आनंदाची ती चित्कळा कधी ना कधी स्वाधीन करून जाते आणि रडके, धास्तावलेले, उदास जीवन आनंदाने काठोकाठ भरून टाकते अर्थात् एखाद्या फळाप्रमाणे जेव्हा भक्ती पिकते तेव्हाच ही अमृतसिद्धी लाभते.

|| साई ॐ ||

**ॐ राजाधिराज योगीराज परब्रह्म श्री सच्चिदानंद सद्गुरू श्री साईनाथ महाराज यांचे**

समाधी मंदिर, द्वारकामाई, धुनी आणि शिरडी परिसरातील दृश्ये **'शिरडी'** ह्या इस्टमनकलर फिल्ममध्ये चित्रीत केलेली आहेत. सुंदर मराठी, हिन्दी, संस्कृत अभंग, हिन्दी कॉमेन्ट्री, विविध भाविक लोकनृत्यांसहित आरत्या ह्या १६ मिनिटांच्या फिल्ममध्ये चित्रीत केल्या आहेत.

सुटींग 16 M. M. मध्ये असून त्यावरून ८ M. M., 16 M. M., 35 M. M. शिवाय VIDEO फिल्म कॉपी काढणे शक्य आहे.

**संस्थानी, साईभक्तांनी पुढील पत्त्यावर संपर्क साधावा :**

**श्री. सुनील चुंबळे**
'मधुली', ५, निनाद अपार्टमेंटस्,
अशोक स्तंभ, नाशिक : ४२२००१
**फोन : ४१५०**

# राणी छाप रुपयांची खैरात

—श्री. प्रभाकर कोळमकर
१९ गुंफादर्शन, दत्तपाडा, बोरीवली मुंबई ६६

● दि. १ फेब्रु. १९८२ श्री साईलीला कवि-लेखक सम्मेलनाचा शिरडी क्षेत्रातील दुसरा दिवस! मी, पत्नीमुलांसह द्वारकामाईचे दर्शन घ्यावयास गेलो. दर्शनसुख घेतल्यावर सहज म्हणून द्वारकामाईच्या कट्टयावर बसलो. तेथे एक वृद्ध गृहस्थ बसले होते. सदरा, धोतर व पागोटे त्यांनी परिधान केले होते. शेजारच्या एक तरुण भक्ताला ते शिरडी विषयी काही माहिती सांगत होते. माझ्यातील कुतुहूल जागृत झाले. मी त्यांना सहज प्रश्न केला, 'द्वारकामाईतील ही धूनि किती वर्षाची आहे?' ते उद्गारले, 'सव्वाशे वर्षे!'

नंतर मी त्यांना आणखी प्रश्न विचारले. 'बाबा येथे बसत तेव्हा तुम्ही किती वर्षाचे होता? बाबा तुम्हाला कसे दिसत? बाबा तुमच्याशी बोलत का?' इ. इ.

गृहस्थ फारच बोलके वाटले. त्यांनी माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली व श्री बाबांच्या विषयी जी माहिती सांगितली ती मला फारच मनोरंजक वाटली म्हणूनच मी ती प्रसिद्ध करीत आहे.

श्री बाबांचे डोळे पाहूनच भिती वाटे अतिशय रागीट दिसत परंतु अंतःकरणात अपार दया, करुणा होती. मी त्यावेळी २२–२३ वर्षाचा होतो.

मी तर श्रीबाबांना दुरूनच नमस्कार करीत असे. जवळ जाऊन त्यांना नमस्कार करण्याची हिम्मतच नव्हती. वाटायचे न जाणो, बाबा भडकले तर सोटाच डोक्यात मारायचे! त्यामुळे सर्वच त्यांना घाबरायचे!

श्री साईबाबा दररोज अस्सल चांदीचे 'राणी छाप' (१८८५) चवली, पावली व दब्बू आकाराचे रुपये वाटायचे.

श्री साई भक्त श्री बाप्पाजी लक्ष्मण रत्नपारखी हे शिरडीलाच राहतात. त्यांच्या घरातच श्री विठ्ठल मंदिर आहे. आज त्यांचे वय सुमारे ८७ वर्षे आहे. त्यांनी बाबा

ह्यात असताना त्यांची दहा वर्षे सेवा केली आहे. एकदा द्वारकामाईत बाबा त्यांच्या कफनीच्या लांबच्च लांब खिशातून राणी छाप चवली पावली रुपये ( ढब्बू आकाराचे ) काढीत असताना एक चवली जमिनीवर पडली. बाबांनी बाप्पांना हाक मारली व म्हणाले, 'ही चवली घे !'

पण बाप्पाजी घाबरले. त्यांना वाटले साईबाबा रागावले तर आपल्याला सोट्याने मारतील म्हणून ते लांबच लांब उभे राहिले. त्यावेळी बाप्पांचे वय २२/२३ वर्षे होते. बाप्पा चवली घेत नाहीत हे पाहून श्रीसाईबाबा स्वतः एक पायरी खाली उतरून आले व म्हणाले, 'अरे ही चवली घे !'

त्यावेळी त्यांची भीती कमी झाली व ती श्रीबाबांची चवली त्यांनी घेतली. हा श्रीबाबांचा प्रसाद 'चवली' ( १८८५ सालची राणी छाप ) अजूनही त्यांच्या घरात आहे. या चवलीसुळे श्री रत्नपारखी घराण्याची खूपच भरभराट झाली.

१५ ऑक्टोबर, १९१८. मंगळवारी दु. २–३० वा. श्रीसाईबाबा बसल्याजागीच सहजपणे 'द्वारकामाईत'च समाधिस्थ झाले. यानंतर त्यांच्या समाधिस्थ देहाच्या अंत्य संस्काराबद्दल हिन्दू आणि मुस्लीमांचा भयंकर वाद-विवाद झाला. शवरूप श्रीसाईबाबा दोन दिवस नुसते पडून होते. दिनांक १७ ऑक्टोबर, १९१८ रोजी पहाटे श्री लक्ष्मण मामा रत्नपारखी यांच्या स्वप्नात श्रीसाईबाबा आले व त्यांनी त्यास **काकड आरती म्हणण्याचा दृष्टांत दिला.** सध्याचे हयात श्री बाप्पाजी हे त्यांचे सुपुत्र होत. त्यांनीच पुढील ओळी म्हणून दाखविल्या.–

'मी आहे नित्य जिवंत
मुंग्या सारखे येतिल भक्त ।
भक्ता मी पावेन सत्य
करी काकड आरति माझी ॥'

श्रीसाईबाबा दररोज शिरडीत राहणाऱ्या भक्तमंडळींना अस्सल राणी छाप चांदीचे ( ढब्बू आकारी ) रुपये वाटीत. श्रीबाबांच्या फाटक्या पायघोळ कफनीतील लांबच लांब खिशातून चवली, पावली व रुपये कोठून येतात याचे सर्वांनाच नेहमी कुतूहल वाटे. त्यावेळचे निवृत्त लॅन्ड रेकॉर्ड ऑफिसर, श्री हरी विनायक साठे, राहणार शुक्रवार पेठ, पुणे हे अतिशय बुद्धिमान गृहस्थ होते त्यावेळच्या इंग्रज सरकारने त्यांच्या 'लॅन्ड रेव्हेन्यु' पुस्तकास दहा हजार रुपये बक्षिस दिले होते. हे गृहस्थ रोज येऊन बसत व

श्रीबाबा पैसे कोठून कसे काढतात त्याचे निरिक्षण करीत. पैसे कोणाकोणाला व किती वाटले याची नोंद ते नेहमी ठेवीत. त्यांना नेहमी वाटायचे की बाबा जादू, भानामती, पिशाच्च-विद्येने ही सर्व नाणी निर्माण करतात व वाटतात. त्यांनी केलेल्या नोंदी श्री रत्नपारखी यांना अजूनही आठवतात त्या येणे प्रमाणे :-

श्रीबाबा एकूण सुमारे ७००/७५० अस्सल चांदीचे राणीछाप रुपये दररोज पुढील भक्ताना देत. त्यांची आजच्या रुपयात किंमत केली तर ती सुमारे १२०००/१३००० रुपये होईल.

| | |
|---|---|
| १) पीर महंम्मद यासिनमिया फकीर यांना बाबा दररोज | रुपये ५५–०० देत असत |
| २) तात्या पाटील कोते | ३५–०० ,, ,, |
| ३) बयाजी पाटील कोते | १५–०० ,, ,, |
| ४) रामचंद्र पाटील कोते | २५–०० ,, ,, |
| ५) भागोजी शिंदे | १०–०० ,, ,, |
| ६) महादेव फसले | १५–०० ,, ,, |
| ७) कोंडाजी मुसलमान | १७–०० ,, ,, |
| ८) जमलाबाई कोंडाजी | १२–०० ,, ,, |
| ९) झुंबर कोंडाजी यांना दररोज | ०५–०० ,, ,, |
| १०) तीन गवई ( त्यापैकी एक श्री नथूसा गवई, येवले गावचे ) रु. १६ प्रत्येकी | ४८–०० ,, ,, |
| | २३७–०० |
| ११) तमाशेवाले बत्तीस होते त्या प्रत्येकास श्रीबाबा ४ रु. देत | १२८–०० |
| | ३६५–०० |

तसेच श्रीबाबा कीर्तनकार, मौलवी, सन्यासी, फकीर, भिक्षुक, ब्राह्मण इ. ना त्यांच्या इच्छेनुरुप दान, देत–अति गरीब, धार्मिक, दयाळू यांनाही श्रीबाबांच्या इच्छेनुरुप ' रुपये ' मिळत.

श्रीसाईबाबांच्या या ' दान-पुष्पा ' बद्दल अधिक संशोधन, अभ्यास करावयाचा असेल त्यांनी शुक्रवार पेठ, पुणे येथील श्री हरि विनायक साठे यांच्या वंशजाकडे चौकशी करावयास हवी म्हणजे त्याना अधिक तपशील मिळेल असे मला वाटते.

॥ श्रीसाई कृष्णार्पणमस्तु ॥

☆

श्री साईनाथ अहिंदु होते, अशा कल्पना करून बरेचजण आजही बाबांपासून दूर आहेत. पण त्यांना केव्हा कळणार की बाबा सर्वज्ञ होते.

श्री साई अग्नी उपासक होते. अग्नीची पूजा त्यांना प्राणप्रिय होती. पारसी, मुसलमान, ख्रिस्ती, सिंधी, हिंदु सर्व धर्म प्रिय असेच माझे साईनाथ होते.

माझ्या साईनाथांना माझ्या मनातील सूक्ष्म लहरीसुद्धा समजतात. माझ्या अड-चणी, विचार, वगैरे लगेचच त्यांना समजते. त्या ते दूरही करतात. मला हवी तेव्हा त्यांची भेट घेता येते, असे असताना मी इतर संतांकडे कशी जावू ?

इतर संत माझ्या दृष्टीने फारच मोठे आहेत. त्यांच्या भक्तीच्या पायऱ्या मला चढणे कठीण आहेत. मी त्या चढूसुद्धा शकणार नाही, आणि म्हणूनच....

मी माझ्या गरीब, फकीर वृत्तीच्या संताच्या मागे आहे आणि तेच मला प्राण-प्रिय आहेत.

## इंदूरचे साईराम गेले !

इंदूरमधील लोकमान्य नगर निवासी श्री. श्रीपाद वैद्य, वय अदमासे ५६–५७ वर्षे, ज्यांना इंदूर शहरातील सर्व लहानथोर साईभक्त 'साईराम' म्हणून म्हणायचे व 'साईराम' ह्याच नावाने ते शहरातील प्रत्येक व्यक्तीस प्रसिद्ध होते. दि. ३० मे १९८२ रोजी रात्रौ १०–३० वाजता श्रीसाईचरणी लीन झाले. गेल्या १–२ वर्षांपासून त्यांना रक्तातील मधुमेहाचा त्रास होता.

श्री. 'साईराम' प्रेमळ, सहृदय, साधी राहणी व हसऱ्या स्वभावाचे होते. ते मध्यप्रदेश विद्युत विभागात ट्रेसर म्हणून नोकरीवर होते. ते श्री शिरडी बाबांचे परम प्रिय भक्त होते. स्वतःच्या निरनिराळ्या अनुभवाने आराखड्यानी आराधनेने व साधनेने त्यांनी श्री शिरडीबाबांना आपलेसे केले होते. बाबांची त्यांच्यावर अतोनात माया व कृपा होती. निरनिराळ्या प्रसंगी व निरनिराळ्या रूपाने श्री शिरडीबाबांनी त्यांना दर्शन दिले होते व त्यांना मदत केली होती. बाबांचे समक्ष दर्शन कितीतरी वेळा, आराधनेत त्यांना झालेले होते. बाबांच्या ह्या भक्ताने श्री बाबांचे नियम पूर्णपणे जीवनात उतरवले होते व मुक्तहस्ताने व मनापासून गरीबांची, महारोग्यांची, कोढींची सेवा केली होती.

254

# माझे गुरू–श्रीसाई

**सौ. सुनिता चावक**
अशोक भुवन नवापाडा
विष्णुनगर, डोंबिवली ( पश्चिम )

● श्री साईनाथ हेच का ग तुझे गुरू ? ' इतके इतर संत असताना तू साई-बाबांच्याच का ग मागे ?

वरील प्रश्न माझ्या मैत्रिणीने मला विचारलेत. प्रश्न विचारणारी मैत्रिण माझी बाल मैत्रिण आहे. माझी ' माझी साईंच भक्ती ' का ? ह्या प्रश्नाचे उत्तर तिला हवे होते.

' श्री साईबाबा ' हेच माझे गुरू होत, कारण त्यांना हवी असते नुसती भक्ती आणि त्यांच्या भक्तीचा मार्ग ठराविक चाकोरीबद्ध नसल्याने ती भक्ती मी माझ्या मनानुसार करीत असते. जेव्हा जेव्हा मला सवड मिळते तेव्हा तेव्हा मी त्यांची आठवण करते. मग ती वेळ सकाळ, संध्याकाळ किंवा रात्र असो, आणि त्यांची मूर्ती डोळ्यासमोर आणते. त्यांच्या नावाचा जप करते. ते खरोखर कसे दिसत होते. ह्याचा सुद्धा विचार मनात येत असतो. हीच माझी भक्ती.

इतर संताची भक्ती करण्याची पद्धत व माझी भक्ती पद्धत ह्यात फरक आहे. इतर संताच्या भक्ती करण्याकरता त्यांच्या चरित्राची पारायणे करावी लागतात, सोवळे, पुजा, तसेच हे सर्व करण्यासाठी दिवसाच्या ठराविक वेळा ठरवून हे करावे लागते. पण मला ह्यातील कुठल्याच प्रकाराची गरज भासत नाही.

इतर संतांना स्वच्छ मनाची मानस पूजा लागते. पण माझ्या साईनाथांना मलीन मनाची प्रार्थना सुद्धा समजते.

माझ्या साईनाथाला अपवित्र, त्याज्य असे शब्द मुळीच आवडत नव्हते. माझ्याकडे इतर संताच्या भक्तीसाठी मनाचे पावित्र्य नाही, तर माझे मन नेहमीच अपवित्र असते. मला स्वार्थ सोडवत नाही. हेवेदावे कायम माझ्या मनी आहेत. आणि मग हे असतानासुद्धा श्री साईनाथच मला जवळ करू शकतात.

२५५

# श्री साईबाबांचा लाडका शामा

श्री. माधवराव बळवंत देशपांडे हे श्री साईबाबांचे अत्यंत लाडके भक्त परंतु त्यांची पूर्ण माहिती विशेष स्वरूपात कुठे दिसून येत नाही. परंतु शिर्डी येथील श्री साईबाबांच्या समकालीन श्री. बा. ल. रत्नपारखी यांनी दिलेली खरी माहिती.

माधवराव देशपांडे हे मूळचे राहणारे निमोण ता. संगमनेर येथील. आपसातील भाऊबंदकीमुळे त्रास होत असे. म्हणून शिर्डीस लक्ष्मणराव रत्नपारखी ( मामा ) यांचे घरी आश्रयास आले. पुढे बरेच दिवसांनी त्यांचे लग्न मामांनी करून दिले. त्यांच्या पत्नीचे नाव सौ. सावित्रीबाई त्यांना ३ मुले व एक कन्या झाली. नंतर माधवरावांना मामांनी आपल्या जागेतील थोडी जागा रहावयास दिली. व्यवसाय म्हणून खाजगी शाळा मास्तरकी ते करू लागले. शरीराने निकोप दांडगे होते. जोडधंदा म्हणून वैद्यकी पण करीत होते. पुढे ५ वर्षांनी अस्तगाव येथे पाटील म्हणून सरकारी नेमणूक झाली. काही कारणामुळे ही नोकरी सोडून ते पुन्हा शिर्डी येथे आले. पुढे काही दिवसानी श्री. हरी विनायक साठे यांच्या वाड्याचे काम सुरू झाले व त्याची देखरेख करण्याचे काम त्यांच्याकडे होते. तसेच दीक्षित यांच्या भोजनगृहाचे काम पाहण्याची कामगिरी त्यांना मिळाली. अशा रीतीने चरितार्थ चालू लागला व त्यावेळी श्री. साईबाबांच्या जवळ बसणे त्यांना चिलमीत तंबाखू भरून देणे, त्यांची सेवा करणे इत्यादी कामे अगदी निस्वार्थ हेतूने करीत होते. पुढे श्रीमंत बुट्टीच्या वाड्याचे ( समाधी मंदीराचे ) काम माधवरावांच्या देखरेखी खाली सुरू झाले. १९१२ पासून हे काम सुरू झाले ते पूर्ण होईपर्यंत त्यांनी बघितले. श्री साईबाबांच्या दरबारात शामराव केव्हाही येत. त्यांना कोणीही आडकाठी करीत नसत. श्री साईबाबांचा असा हा लाडका उजवा हात शामा उर्फ श्री. माधवराव बळवंत देशपांडे.

**—सौ. उषाताई मुळे, शिरडी**
१६० नारायण पेठ, पुणे ३०

# बाबा आहेत तरी कसे !

—निलिमा ज. नाईक
शिवसृष्टी, कुर्ला ( पूर्व )

● श्रीसाईबाबांचे चमत्कार, आपुलकी, वेळोवेळी होणारी मदत, यावरून बाबा आपल्याला कसे आहेत हे सर्वांना माहितच आहेत. त्यांच्या वेळच्या काही व्यक्ती अजूनही आपल्याला त्यांचे अनुभव सांगतात. त्यावेळी मन आनंदाने नाचते. अजूनही शिर्डीतल्या मंदिरातील त्यांची मूर्ती व विशेषतः द्वारकामाईतील त्यांची प्रतिमा बघून ते आपल्याशी हसताहेत व आता आपल्याशी बोलतील असे वाटते.

असेच एकदा मी विचार करत असताना बाबांना म्हटले, 'बाबा तुम्ही आहात तरी कोण व कसे? तुम्ही सर्वज्ञ व हसतमुख कसे हो? त्याच दिवशी मला काहीही सुचत नव्हते व रात्रौ मला स्वप्नात येऊन ते म्हणाले, 'मी कसा आहे हेच पाहिजे ना मग नीट लक्षपूर्वक ऐक.' आणि मग ठरव मी कसा आहे तो.' त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मी माझ्या बुद्धिपटावर शॉर्टहॅण्डच्या सहाय्याने बरोबर टिपले ते असे–मी सर्व देवांचा मिळून बनलो आहे. तो असा – ब्रह्मा, विष्णु यांच्या उजव्या हाताच्या घर्षणाने साईबाबा निर्माण झाले.

दोन्ही डोळे ब्रह्मदेवाचे घारे दिसायला. हनुवटी-स्वामी ( जग विख्यात यमाची ) ओठ-गणपतीच्या सिद्धिचे. लाल चुटुक स्मित करताना गुलाबाचे फुल उमलतय जणू! दंतपंक्ति-विष्णुदेवाची पांढरी-हिरड्या-स्वामीच्या पुढचे दोन दात खालचे व वरचे खंडोबाचे बाजूचे ४–४ दात भार्गव ऋषींचे.

नाक–उर्वशी नर्तकीचे–कान–शंकराचे आणि त्यांचा आकार, शामकात हा अत्यंत सुंदर घोडा होता त्याच्या लांबीचे पण मनुष्याकृति आहेत. मेंदू-गणपतींचा अगदी हुषार. हृदय-दत्तात्रयांचे त्यामुळे ते 'दत्तगुरू साईच' आहेत. ते नेहमी एकत्र असतात. एकमेकांशिवाय त्यांचे पानच हलत नाही. हृदयात ७ सिध्दि आहेत. त्यांचे हात काश्यप यांचे आहेत. हातांची दाही बोटे भरपूर लांब असून वसिष्ठ ऋषींच्या हाताच्या बोटांची लांबी आहे. हाताच्या उजव्या अंगठ्यात लक्ष्मी व डाव्या अंगठ्यात सरस्वती आहे. उजवा तळहात नियतीचा व डावा हात कन्यकांचा आहे.

अंगाचा थरकाप उडविणारा अनुभव

# तयाचिया मी मागेपुढे चोहिकडे उभाच !

—सौ. नीता नामदेव खामकर
बी/१६ मोहनराज कॉ. हौ. सोसायटी
इराणी वाडी नं. ३ हेमू कॉलनी रोड नं. ३
कादीवली पश्चिम, मुं. ६७

● 'भाजू दे रे हा हात मेला प्राण रे वाचला पोरीचा' हे बाबांचे शब्द माझ्या बाबतीत खरे ठरले. हात भाजला नाही. पण प्राण जायची वेळ होती. एकवार बाबांकडे मागणं मागितलं 'बाबा काय केले प्राण जाण्यापूर्वी एकतरी लेकरू दिसू दे.' तोच दहा मिनिटाच्या अवधीत माझा मोठा मुलगा दिसला आणि कुडीत प्राण येऊ लागले. चैतन्याने मी हर्षभरीत झाले. पुढचं सारे बाबांवर....

२७ एप्रिल १९८२ वेळ दुपार. दादरला लग्नासाठी कांदिवलीहून सव्वादोनच्या ट्रेनने जाण्यास निघाले. ट्रेनमध्ये सवयीप्रमाणे मोठा मुलगा वय ६ वर्षे, गावाहून (एकच महिना) येऊन प्रथमच बाहेर पडलेली घरकाम करणारी मुलगी वय वर्षे ९ तिच्या कमरेवर माझा आणखी छोटा मुलगा वय वर्षे १ या तिघाना ट्रेनमध्ये चढविले. मी चढणार इतक्यात माझ्या हातावर जोरदार फटका बसला. त्याबरोबर मी हातातल्या जड पिशवीसह तोल जाऊन पाठीवर प्लॅटफॉर्मवर आदळले. पण आपली मुलं अज्ञान आहेत म्हणून जीव तोडून चालत्या ट्रेनमध्ये चढले. चप्पल खाली पडली. एक पाय वर चढतच नव्हता. मनाचा थरकाप होत होता. पण गाडी सोडवत नव्हती. लोक ओरडत होते. मी गाडीखाली जाणार असं साऱ्यांना वाटत होते. माझा मोठा मुलगा पुढे आला, आणि मी पुन्हा प्लॅटफॉर्मवर आदळले. पण मी चालत्या गाडीबरोबर वेड्यासारखी धावत सुटले. ''समीर पुढे येऊ नको.' इतर लोकांनी धरले. तुमचा जीव धोक्यात का घालता ? मुलं मिळतील.' मी म्हटले, 'अहो, पण माझी मुलं लहान अज्ञान आहेत. पुढं समोर अंधारी येत होती. डोळयातून अश्रूचा थेंब येत नव्हता. वाचा फुटत नव्हती. शरीर थंडगार पडल्यासारखे वाटत होते. पण त्याचवेळी 'बाई, तुम्ही धीर धरा. तुम्हाला मुलं दिसतील ? मुलांना आई पाहिजे ना ! मग चला कांदिवली स्टेशनमास्तरकडे! सूटकेस, कपडे, दागिने, अहेर अशा वस्तूची जड पिशवी मी एक नंबर प्लॅटफॉर्मवर टी. सी.जवळ ठेवली. ऑफीसमध्ये नाव, वय वर्षे सांगितले. पण मी काय बोलत होते याकडे माझे लक्ष नव्हतं. मला काय होत होते, याची क्षणिक जाणीव

पाय हिमाचलासारखे. चारी धाम शक्ती त्यामध्ये (ब्रह्मा, विष्णु, गणपति आणि नियति यांची.) मानेपासून कमरेपर्यंत नीलवर्णीय आहेत. कृष्णासारखे कमरेपासून गुडघ्यापर्यंत (मांडया) कर्णाच्याच आहेत. पोटरी (पायाची) वरुण देवाची आहे. दोन्ही पोटऱ्यांमध्ये एकेक सिध्दि आहे. उजवा अंगठा पायाचा शिव असून पायाच्या डाव्या अंगठ्यात शक्ती आहे. पोटाची कातडी लविमा सिध्दिच्या प्रयोगाने साफ करतात. (एकेक बाजूला करूला) ती प्राप्त करण्यासाठी ७५ वर्षे तपश्चर्या करावी लागते. अंगकांति गणपतीची लाल + गुलाबी जितेंद्रियावर विजय मिळवून कामदेवांची कृपादृष्टि आहे. मद, मोह, मत्सर, लोभ षट्‌रिपूवर विजय मिळविला आहे वीरभद्रांचा, रामभाऊ स्वामींच्या आदेशानुसार डोक्यास नेहमी मुंडासे बांधतात. पायात कधीहि चपला घालीत नाही. केस ब्रह्मदेवाचेच आहेत.

मोठमोठी फळे, शेती करणे, सुंदर वस्तूंचा संग्रह करणे, मैफिली रंगविणे हे उद्योग. नाचगाणी यांची आवड. नटराजांचा वरदहस्त त्यामुळे स्वतःहि नाचगाणे बजावतात. अफू, गांजा, चरस ओढणे यांची आवड. शांत, करारी, बाणेदार वृत्ती. आपले तेच खरे करणे ही जिद्द. माणूस जिद्दीला पेटला तर त्याला रसातळाला पोहोचविणे हा उद्योग. त्यांच्याकडून काही मिळवावयाचे असेल तर गोडीगुलाबीने करून घेणे. गोडीने राहिल्यास भरपूर पुण्य जमा होते.

हिन्दु–मुस्लिम ऐक्यासाठी वेष असा – लुंगी–सदरा, मुंडासे. त्यांची धुनी म्हणजे हिन्दु–मुस्लीम ऐक्याचे प्रतिक व जातीयवाद जाळून टाकणे हा उद्देश. मशिदीत अग्नी नेवून धुनी तयार केली व हिन्दु मुस्लिम ऐक्य स्थापले.

धुनीने दिली ती उदी. तेच औषध ते सर्वांना देते.

त्यांची मुख्य तत्वे म्हणजे श्रद्धा आणि सबुरी. महान शिवपद देणारी अशी त्यांची ती मशिद. शिर्डी म्हणजे पूर्वीचे पंढरपूर. आताच्या पंढरपूरच्या पूर्वेला शिर्डी आहे. द्वारकामाई म्हणजे श्रीकृष्णाची द्वारका, दक्षिणेला आहे म्हणून आणि प्रेमळ स्त्रीचे प्रतिक म्हणून माई अशी ही साईबाबांची द्वारकामाई.

अशा ह्या सर्वांच्या आवडत्या साईनाथांच्या चरणी माझे शतशः प्रणाम!

नव्हती. किंबहुना मी त्या मर्त्यमानवाच्या विश्वसंसारात मी नव्हते. माझ्यासमोर अंधार प्रचंड तिमिर...कसलीही शलाका नव्हती. कांदिवली स्टेशनमास्तर आणि इतर कर्मचाऱ्यांनी फारच सहाय्य केले. सारखे दोन टेलिफोन हॅलो हॅलो पुकारत होते. मालाड, गोरेगाव फोन झाले. मला सारखे प्रश्न विचारून बोलके ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. मिस्टरांचा ऑफीसचा पत्ता विचारला आणि अंधेरीपर्यंत फोन केले. मी मनात साईबाबांना नमस्कार केला. 'बाबा, हे काय केलंत' अखेरचा कवटाळून नमस्कार करते. 'प्राण जाण्यापूर्वी एक तरी लेकरू दिसू दे! अचानक छोट्याची दुधाची बाटली माझ्या हातातून निसटली. त्याबरोबर स्टेशनमास्तर ओरडला, 'देखो आपका लडका आता हैं।' मी क्षणिक जागी झाले. पण अंधारी होती. माझा मोठा मुलगा मला घेऊन कमरेला विळखा घालून बिलगला. त्याने विचारले, 'आई तू चढलीस का नाहीस? माझ्याकडे उत्तर नव्हते. माझा हात माझ्या छातीवर गेला क्षणिक बळ आणत 'बाबा आता धीर द्या. पाय उचलला जात नाही.' त्याबरोबर एकजण ओरडला 'तुमची पिशवी आहे. ती घेऊन या जा! मी पिशवी आणली. ऑफीसमधून सारखे फोन अंधेरीपर्यंत केले जात होते. ज्या व्यक्तीने समीरला आणले त्या व्यक्तीने मला तोंडही दाखविलं नाही की थांबलाही नाही. खरोखरच संकटार्थ धावूनी येतो माझा हा साई। आता माझे सारे लक्ष १ वर्षाच्या बाळाकडे आणि त्या मुलीकडे! काय होईल? पण बाबांची अगाध लीला! त्या नवख्या अज्ञान मुलीला चांगली सुबुद्धी बाबांनी दिली. त्या मुलींनी डबा शोधला. डब्यात काकी समीर दिसेना. तशी येईल त्या स्टेशन वर उतरली. स्टेशन होते गोरेगाव! एक स्मिता वाघ नावाची चांगली मुलगी बोरीवलीस काजूपाड्यास राहाते. अशा अनोळखी मुलीला रडत रडत 'मी चुकले. माझी काकी दिसत नाही.' त्या मुलीने सांगितले. त्या स्मिताने बाळास घेऊन त्या मुलीचा बोट पकडून गोरेगाव स्टेशनमास्तर श्री. पाटकर यांच्याकडे सुपूर्त केली. इतक्यात कांदिवली स्टेशनमास्तरने सांगितले, 'तुम्ही एकट्या जाऊ शकता का? तुमची मुले गोरेगाव स्टेशनमास्तरकडे आहेत. मी आनंदीत होऊन चालू लागले. कोणी, कोठून कसे बळ आणले. असे सारे विचारणा करतात पण सारी साईलीला! त्यांच्या आधारे, चालत असता पर्स पडली. एका बाईनी उचलून दिली. गोरेगाव स्टेशनमास्तरकडे एका बाईच्या आधारे गेले. मला मुले दागिना मिळाला. माझा जीव वाचला. त्या लोकांनी स्टेटमेंट लिहिलं. मी फक्त सही केली. चोहिकडे आनंद भरला होता. पण एक मनी रूखरूख लागली. तिचा पत्ता मिळाला नाही. साधे थँक्स मानले. पण मी कोणाकोणाचे पत्ते घेतले असते? समीरला वाचविणारा कोण? मला ऐन संकटात धीर सहाय्य देणारे कोण? नवख्या मुलीला सहाय्य करणारी कोण? माझा साईनाथ! संकट समयी धावून येई। चोहिकडून सहाय्य करी।

माझे आईवडील सौ. जीवनलता अनंत साळवी आणि अनंत यशवंत साळवी हे साईबाबा परमभक्त आहेत. दरवर्षी शिरडीवारी असते. शिवाय आईचा वर्षातून साईचरित्र सप्ताह चार वेळा असतो. अशा मातेचे लेकरू बाबांनी वाचविलेच! बाबांचे शब्द आईला आठवले. माझ्या अंगाला अंगारा लावत ती म्हणाली, प्राण रे वाचला पोरीचा!

# श्रीबाबांच्या कृपाशीर्वादाचा वर्षाव झालेले ७४ महाभाग

—सौ. उषा अधिकारी
बंदररोड, रत्नागिरी

१) **चांद पाटील**-बाबांनी याला अलौकिक सामर्थ्याने अग्नि व पाणी निर्माण करून चिलीम पेटवून दिली. सांडलेली घोडी सापडून दिली. त्याच्या घरादाराचा पत्ता नसताही त्याचे घरी वास्तव्य केले व त्याची भरभराट केली.

२) **म्हाळसापती**-यांना बाबांनी खंडोबाचे देवळात प्रथम दर्शन दिले. चावडीत व मशिदीत स्वतःबरोबर झोपायला दिले. साईबाबा हेच गुरु कळल्यावर अंतरीचे गुह्य म्हाळसापतींनाच सांगून बाबांनी विश्वासाने ३ दिवस ब्रह्मांडी प्राण नेऊन ठेविला व म्हाळसापतींकडून रक्षण करविला. आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग शिकविला. आपल्या भक्तांच्या नवरत्न मालिकेत यांना अग्रस्थान दिले. पूजेचा मान दिला व स्वतःच्या कंठाला गंध लावू दिले.

३) **माधवराव देशपांडे**-बाबांचा लाडका श्यामा. सख्य भक्तीचे उत्तम उदाहरण. मास्तरची नोकरी सोडावयास लावून जनसेवेचे व्रत दिले. विष्णूसहस्त्रनामाची पोथी दिली. भयंकर सर्प विषापासून संरक्षण केले. काशी, प्रयाग यात्रा श्रीमंती थाटात घडवून आणल्या. आत्मज्ञान प्राप्ती करून दिली. यांना भक्त श्रेष्ठ मालिकेत महत्त्वाचे स्थान दिले व फार प्रेम केले.

पूत वेष घेऊन टांगा, घोडा निर्माण करून त्यांच्या कन्येचे बाबांनी रक्षण केले. गीतेचे निरूपण स्वतः करून त्यांना आत्मबोध केला. मन विचलीत होऊ लागताच ते ताळ्यावर आणले. श्रेष्ठ भक्तात उच्च स्थान दिले. शिरडीत लोकांना अन्नपाणी, वाहन मिळण्यासाठी पुतण्याकडून सेवा करण्याची प्रेरणा दिली.

१०) **बापूसाहेब बुटी**–हा कोट्याधीश माणूस असूनही साध्या निरोपासाठी कामे करून घेतली. त्यांचेकडून टोलेजंग वाडा बांधून घेतला. अनेक व्याधी निर्माण झाल्या असता, प्रसंगी सर्परूपाने काळ जवळ आला असता त्यांचे रक्षण केले. अखंड सहवास दिला. प्रेम केले. उच्च स्थानी भक्त मालिकेत बसविले.

११) **मेघा**–पोर वयाचा गुजराथी ब्राह्मण शंकरभक्ती जाणून आत्मलिंग दिले. त्रिशूल काढायची आज्ञा दिली. शिरडीतील सर्व देवांची पूजा करून घेतली एका पायावर उभा राहून आरती करण्याची इच्छा बाबांनी पुरवली. संक्रांतीचे वेळी सचैल स्नान घालण्यास त्यास अनुमती दिली. भक्तांच्या मालिकेत उच्चस्थानी ठेवले. मेघाचा मृत्यू होताच स्वतः रडलेच पण त्याचे शव फुलांनी शृंगारले. त्याचेवर निस्सीम प्रेम केले.

१२) **बायजाबाई**–तात्याची आई. बाबांची मामी. रानोमाळ हिंडून श्रीबाबांना भाकरी भरवी. तिचे हाल चुकवण्यासाठी मशिदीत राहू लागले. तिच्या हातची भाकर खाऊ लागले. इतरांवर रागावणारे बाबा बायजाबाईच्या आज्ञेत वागत. तिच्यावर आईप्रमाणे माया केली. तात्याचे रक्षण करण्याचे दिलेले वचन स्वतःचा प्राण देऊन पूर्ण केले.

१३) **राधाकृष्णा आई**–मीरेसारखी भक्ती. तिला उत्सव सुरू करण्याची प्रेरणा दिली. अज्ञात राहून सेवा करण्याची इच्छा पूर्ण केली. बाबांचे उष्टे खाण्याची इच्छाही पूर्ण केली. तिने मिरवणुकीचे सर्व साहित्य तयार केले उत्सवासाठी लागणारे सर्व साहित्य पण तयार करण्याची तिची इच्छा पूर्ण केली.

१४) **लक्ष्मीबाई शिंदे**–प्रेमाने सेवा करून दिली. रोज २ वेळा तिच्या हातची भाकर खाल्ली. शेवया खाल्ल्या. तिची निरागस भक्ती पाहून तिला चांदीचे ९ रुपये मरणसमयी दिले व नवविधा भक्तीची माळ तिच्या गळयात घातली.

१५) **बाळासाहेब देव**–श्रीबाबांनी संन्यासाचे वेषाने दोन गृहस्थ बरोबर घेऊन देवांचे घरी भोजन करून त्यांची इच्छा तृप्ती केली. ज्ञानेश्वरी वाचनाचे मार्ग-

**४) तात्या कोते**–श्रीबाबा तात्याचे मामाच बनले. छोट्या तात्याला स्वतः बरोबर चावडीत, मशिदीत झोपायची परवानगी दिली. मशिदीचा जीर्णोद्धार करून घेतला. तात्याच्या पाटीलकीच्या अहंकाराचे दहन केले. त्यांच्या जरीचा शिरपेच मस्तकी बांधला. यांचे अत्यंत लाड केले. आईला बायजाबाईला दिलेल्या वचनाप्रमाणे स्वतःचे प्राण देऊन तात्याला दीर्घायुषी केले. दोन वेळा घोर अपघातातून वाचवले. भक्तश्रेष्ठ मालिकेतील हाही एक हिराच होय.

**५) काकासाहेब दिक्षित**–बाबांनी दीक्षित नाव अमर राहावे म्हणून दीक्षित वाडा बांधून घेतला. बोकडाचा वध करण्याच्या निमित्ताने गुरूभक्ती करण्यास लावली. लक्षाधिशाला भिक्षाधीश बनविले पण पूर्ण मनःशांती देऊन 'तुला विमानातून नेईन' या दिलेल्या वचनाप्रमाणे खरोखरच नेले. भक्तश्रेष्ठ मालिकेत उच्च स्थानाला यांना नेऊन बसविले.

**६) दासगणू**–पोलीसची नोकरी सोडायला लावली. संतचरित्रे लिहवून घेतली. स्वतःच्या अंगुष्ठ द्वयातून गंगायमुना निर्माण करून प्रयाग तीर्थाचे स्थान घडविले. विठ्ठलरूपात दर्शन दिले. श्रीरामनवमी उत्सव दासगणूकडून हयात असेपर्यंत करून घेतला. ईशावास्याचे कोडे मोलकरणी करवी उलगडून सर्वांभूती मीच वास करून आहे याचा साक्षात्कार घडवला. या श्रेष्ठ भक्ताला उच्च स्थान दिले, व अपरंपार प्रेम केले. बाबा इतरांवर राग धरीत पण गणूवर उत्कट प्रेम केले. उंची पोषाखाबद्दल कानउघाडणी करून नारदीय कीर्तन पद्धतीने कीर्तने करावयास प्रवृत्त केले.

**७) गोविंदराव दाभोलकर**–'हेमाडपंत' ही अत्यंत मुत्सद्याची उपमा बाबांनी यांना देऊन स्वतःचा 'श्रीसाईसच्चरित' हा ग्रंथ लिहून घेतला. अनेकवेळा रक्षण केले. आपला अखंड सहवास देऊन सेवा करून घेतली. यांना भक्तश्रेष्ठीत उच्च स्थान दिले. होळीपौर्णिमेच्या दिवशी छबी रूपाने गृहप्रवेश केला व अनुग्रह केला.

**८) काकासाहेब महाजनी**–यांना बाबांनी रामनवमी उत्सवाची प्रेरणा दिली. एकनाथी भागवत वाचावयास लावले. आपल्या सेवेची संधी दिली. अखंड सहवास दिला. 'श्रीसाईलीला' मासिकाचे संपादकत्व स्वीकारण्याची प्रेरणा देऊन ते कार्य करून घेतले. भक्तश्रेष्ठात उच्च स्थानी त्यांना बसविले.

**९) नानासाहेब चांदोरकर**–यांना बाबांनी निरोपावर निरोप पाठवून शिरडीत खेचून आणले, खूप सेवा करून घेतली. जनसेवेची प्रेरणा दिली. अस्सल रज-

दर्शन करून मार्गाला लावले. श्रीसाईसच्चरिताची अवतरणिका लिहावयाची प्रेरणा दिली. भक्तमालिकेत मानाचे स्थान दिले.

१६) **बापूसाहेब जोग**–बाबांनी यांना रोजची दुपारची आरती करावयाची कामगिरी दिली. चावडी सुधारणा करून घेतली. वैराग्य प्राप्त होण्याची इच्छा पूर्ण करून साकुरीस वास्तव्य करावयास लावले. भक्तमालिकेत उच्च स्थान दिले.

१७) **काशीराम शिंपी**–याचा भोळा भक्तीभाव पाहून बाबा याचेवर संतुष्ट होते. अहंकाराचा नाश केला. अतीव श्रद्धेचे फळ म्हणून चोरट्यांपासून रक्षण केले व मानाची तलवार मिळवून दिली. बाबांनी काशीरामाने शिवलेले कपडेही काही वेळ घातले.

१८) **भागोजी शिंदे**–महाव्याधीग्रस्त पण त्याचेकडूनच सेवा बाबांनी करून घेतली. हाताला तेल लावणे, लेंडीबागेपर्यंत बरोबर टमरेल घेऊन जाणे. बाबांवर छत्री धरणे ही सेवा करून घेता घेता त्याची व्याधी बरी केली. भक्तश्रेष्ठात उच्च स्थान.

१९) **रा. ब. मोरेश्वर प्रधान**–स्वतःच्या सहवासात राहू दिले. सेवा करू दिली. लेंडीबागेत आमूलाग्र बदल करून ती सुंदर बनविण्याची प्रेरणा दिली. भक्तश्रेष्ठात उच्च स्थान यांना बाबांनी दिले.

२०) **रा. ब. साठे**–यांना बाबांनी लग्न करावयास लावले. पुत्रप्राप्तीसाठी आशीर्वाद गुरुचरित्राचे दोन सप्ताह पूर्ण होताच अनुग्रह केला. लोकांच्या सोयीसाठी आणि साठ्याचे नाव चिरंजीव होण्यासाठी वाडा बांधण्याची प्रेरणा दिली.

२१) **दादा केळकर**–म्हातारे निःस्सीम भक्त. कट्टे ब्राह्मण पण यांना मासळी आणण्याची आज्ञा करून परीक्षा घेतली. पंडीतांचे निमित्त करून आपण ब्राह्मणच आहोत हे पटवून दिले. पूर्ण मनःशांती देऊन सेवा करून घेतली. श्रेष्ठ भक्तमालिकेत स्थान. गुरुपूजा करण्याची प्रेरणा दिली.

२२) **तात्यासाहेब नूलकर**–स्वतःची सेवा करून घेता घेता लोकांची सेवा करून घेतली. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी स्वस्वरुप दाखवून साईमय केले. भक्तमालिकेत उच्च स्थानी बसविले. गुरुपूजेचा मान दिला.

२३) **नानासाहेब निमोणकर**–सेवा करून घेता घेता इतरांची सेवा करून घेतली. अखंड सहवास दिला. प्रेम केले. भक्तमालिकेत उच्च स्थानी नेऊन बसवले. निशाणाचा मान अव्याहत चालू आहे.

२४) **गोपाळ गुंड**–बाबांनी यांची पुत्र प्राप्तीची इच्छा पूर्ण करून शनिदेवाच्या देवळाचा जीर्णोद्धार करावयाची आज्ञा. उरूस व रामनवमी एकाच वेळी साजरा करण्याची प्रेरणा यांना दिली.

२५) **हरिश्चंद्र पितळे**–अपस्मार व्यथित मुलाला बरे केले. चांदीचे ३ रुपये देऊन श्रीस्वामीसमर्थ अक्कलकोट यांच्या भक्तीचे पुनरुज्जीवन केले.

२६) **बाळा पाटील नेवासकर**–दूर राहून भक्ती. श्रीबाबांचे स्नानाचे पाणी पिऊन राहाणे. सर्व उत्पन्न बाबांच्या चरणी. भक्तीभाव पाहून प्रथम वर्ष श्राद्धदिनी अब्रूचे रक्षण केले. कुटुंबावर माया केली. भुजंग रूपात दर्शन दिले. भक्त मालिकेत उच्च दर्जाचे स्थान.

२७) **डॉ. पिल्ले**–नारू रोगापासून मुक्त केले. अपरंपार माया केली. अखंड सहवास दिला. भक्तश्रेष्ठात उच्च स्थान दिले.

२८) **डॉ. पंडित**–स्वतःला गंध लाऊन देऊन पूजा करून घेतली. त्यांचे गुरु काका महाराज पुराणिक धोपेश्वरकर यांचे रूपात दर्शन दिले.

२९) **रामदासी**–अध्यात्मरामायणाची दीक्षा. विष्णूसहस्त्रनामाची पोथी पंचरानी गीता दिली.

३०) **दादासाहेब खापर्डे**–यांच्या मुलाच्या ग्रंथी उठल्या होत्या. त्यांची पत्नी रडू लागताच अभय देऊन ते दुखणे आपले अंगावर घेतले. पती-पत्नींचा स्वतःभोवतीचा दृढभाव पाहून त्यांचेवर अनुग्रह केला. पत्नीला 'राजाराम राजाराम' असे नामस्मरण करावयास सांगितले.

३१) **लाला लखमीचंद**–छबी रूपाने दर्शन. नंतर शिरडी यात्रा घडवली. प्रत्यक्ष दर्शन दिलेच. सांजा भरपूर खायची इच्छा तृप्त करून पाठ, कंबर पोट यात उठणारा शूल नाहीसा केला.

३२) **सखाराम औरंगाबादकरांची पत्नी**–सबंध महिनाभर तिष्ठत ठेऊन तिची परीक्षा घेतली. भोळा व दृढ भाव पाहून तिची पुत्रकामना पूर्ण केली.

३३) **वकील सपटणेकर**–बाह्याकारी क्रोध दाखवून अंतर्यामी प्रेम ठेऊन यांना बाबांनी दर्शन दिले. पुत्रकामना पूर्ण केली. संपूर्ण मनःशांती दिली.

४४) **धरमसी जेठाभाई**–सबीज द्राक्षे निर्बीज करून दाखवली. मनातले सर्व विचार अंतर्ज्ञानाने ओळखून त्यांच्या चंचल चित्ताला स्थिरता आणली.

४५) **तुकाराम कोकाटे**–श्रीबाबांनी पाणी याच्याकडूनच तापवून घेतले. त्यांना दुसरा कोणी चालत नसे. त्याचेकडून सेवा करून घेतली व त्याचेवर प्रेमाचा वर्षाव केला.

४६) **मद्रासीबाई**–सुंदर भजने गावयाची इच्छा पूर्ण करून रामरूपात दर्शन देऊन धन्य केले.

४७) **तिचा पती**–अहंकार घालवला, लोकापासून परावृत्त केले. दृष्टांत देऊन मुसलमानाच्या दैवताचे पूजन त्याचे घरी होते हे दाखवून दिले व रामदासांचे रूपात दर्शन दिले.

४८) **बाबासाहेब तर्खड**–अखंड सहवास. पत्नीचा व पुत्राचा दृढभाव पाहून कृपादृष्टी केली. बंद दरवाजातून प्रवेश करून कोणतेही रूप घेता येते हे दाखवून दिले.

४९) **बेरे**–चोरटे प्रवासात लुटतील या भीतीने त्यांना अभय देऊन त्यांचे चोरट्यांपासून रक्षण केले व सुखरूप पोचवले.

५०) **बाळाबुवा सातारकर**–एका रामनवमीला कीर्तनाला पाचारण करण्याची काकासाहेबांना प्रेरणा देऊन शिर्डीत आणवले. विठ्ठलरूपात दर्शन देऊन ५०० रु. बिदागी देऊन अनुग्रह केला.

५१) **शेवडे**–आपले पदीची निष्ठा आठवून त्यांना परीक्षेत पास केले. पूर्ण अनुग्रह केला.

५२) **विजयानंद**–मद्रासी संन्यासी. मानस सरोवराला जात असता त्याचा मरणकाळ ओळखून आपले जवळ ठेवून त्याला मुक्ती दिली.

५३) **(बापूगीर) रामगीर**–बापूगीर नावाने प्रेमाने हाक. नानासाहेबांकडे आरती व अंगारा घेऊन पाठवले. प्रवासाची उत्तम सोय केली. स्वतः टांगेवाला होऊन टांग्यातून प्रवास घडविला.

**३४) अप्पा कुलकर्णी**–सरकारी कामात तोहमत येईल या भीतीने घाबरला असता पूर्ण अभय देऊन नेवाशास मोहिनी राजाचे दर्शन घ्यावयास लावले व रक्षण केले आणि पूर्ण मनःशांती दिली.

**३५) दामूअण्णा कासार**–पुत्र संततीची आस पूर्ण केली. व्यापारात नुकसान होणार होते. ते वेळीच इशारा देऊन निवारले. निशाणाचा मान दिला.

**३६) तेंडुलकर पुत्र**–डॉक्टरी परीक्षेत नापास होणार या भयाने बसत नव्हता पूर्ण आश्वासन देऊन बसविले व यश प्राप्ती करून दिली.

**३७) चोळकर**–गरीब चोळकराच्या नवसाला बाबा पावले. नोकरी कायम झाली. बिनसाखरेचा चहा पिणाऱ्या (साखर वर्ज्य करणाऱ्या) चोळकरांचे अंतर्ज्ञानाने मनोगत जाणून पूर्ण करून गोड साखरेचा चहा घ्यावयास लावून पूर्ण अनुग्रह केला.

**३८) रतनजी पारशी**–पुत्रकामना पूर्ण केली. नांदेडचे मौल्वीसाहेब व आपण एकच अशी प्रचिती त्यांना आणून दिली

**३९) मुळे शास्त्री**–षट्शास्त्रात निपुण असलेल्या शास्त्रीबुवांना हात न दाखवता घोलकर स्वामींच्या रूपात दर्शन देऊन आम्ही दोघे एकच ही प्रचिती दिलीच पण सोवळे ओवळे धर्म जाती यांच्याबद्दलचा भेदभाव नष्ट केला. अहंकार दवडला.

**४०) काका वैद्य**–वणी देवीचे उपासक. जिकडे तिकडे फिरून मनःशांती लाभेना। तेव्हा श्यामाकरवी शिर्डीस आणून आपले सहवासास ठेवून पूर्ण अनुग्रह केला व मनःशांती दिली.

**४१) उपासनी महाराज**–शिर्डीत खंडोबाचे देवळात कडक तपश्चर्या करावयास लावून, अनेक प्रकारे परीक्षा घेऊन आत्मज्ञान दिले. आध्यात्मिक वारसा त्यांनाच दिला. साकुरीस आश्रम उभारण्याची प्रेरणा. स्वतःचे और्ध्वदैहिक त्यांचेकडूनच करून घेतले.

**४२) खुशालचंद**–पुत्रवत प्रेम केले. मनास आले की राहात्यास जाऊन भेट घेत किंवा येण्यासाठी दृष्टांत देत असत.

**४३) अण्णा चिंचणीकर**–स्पष्टवक्ता पण अंतर्यामी प्रेमळ, श्रद्धाळू साईपदी अनन्यभाव. त्यामुळे फार प्रेमाचा वर्षाव. चावडीच्या रूपाने अमरपद प्राप्त. भक्त मालिकेत श्रेष्ठ.

**५४) बाळाराम मानकर**–मच्छिंद्रगडावर जाऊन राहाण्यास आज्ञा. तेथे ध्यानधारणा. प्रत्यक्ष दर्शन देऊन मनःशांती दिली. परतीच्या प्रवासात कुणबी वेषाने तिकीटही आणून दिले.

**५५) भीमाजी पाटील**–कफक्षयाचा विकार पूर्ण बरा करून त्याला भक्तीची प्रेरणा दिली.

**५६) अब्दुल्ला**–दीपोत्सवाची सेवा. मशिदीत दिवे लावले. श्रीसाईंची सेवा करणे. मुलाचा विवाह करून दिला. अब्दुल्लावर पुत्रवत प्रेम केले. त्याचा वंशवेल बहरून टाकला.

**५७) बडे बाबा**–मनाने चांगले नसताही बाबांनी फार प्रेम केले. स्वतःजवळ बसवून जेवू घातले. रोज ५०–५५ रु. काढून दिले.

**५८) रोहिला**–मशिदीत रात्रंदिवस कलमे पढत असे. मोठमोठ्याने ओरडे, लोक कंटाळले पण अल्लाचे नाव घेणाऱ्या रोहिल्यावर बाबांनी प्रेम करून त्याला अभय दिले.

**५९) आंग्ल गृहस्थ**–दूर ठेऊन का होईना येशू रूपात दर्शन. अपघातात जबर जखमी झाला असता प्राण वाचवले. हिंदू लोकांविषयी जिव्हाळा व प्रेम निर्माण केले.

**६०) कॅप्टन हाटे**–स्वप्नात दृष्टांत देऊन वालपापडीच्या शेंगा खाण्याची इच्छा प्रकट केली भक्तीभावाने अर्पण केलेला रुपया परत देऊन भक्ती दृढ केली.

**६१) बऱ्हाणपूरची स्त्री**–स्वप्नात दृष्टांत देऊन खिचडीची मागणी केली काही दिवस परीक्षा घेऊन तिची खिचडी सेवन करून तिला कृतार्थ केले.

**६२) राधाबाई देशमुख**–बाबांनी मंत्र द्यावा म्हणून ३ दिवस उपोषण केले तिची समजूत घालून उपाशीपोटी केलेली भक्ती देवाला प्रिय होत नाही. गुरूने मागितलेले 'श्रद्धा व सबुरी' हे २ पैसे मी गुरूला दिले. माझ्या गुरूनी मला मंत्र दिला नाही. तेव्हा तुला कोठून देऊ अशी समजूत करून तिच्यावर मुलाप्रमाणे प्रेम केले. पूर्ण अनुग्रह केला.

४४) **धरमसी जेठाभाई**—सबीज द्राक्षे निर्बीज करून दाखवली. मनातले सर्व विचार अंतर्ज्ञानाने ओळखून त्यांच्या चंचल चित्ताला स्थिरता आणली.

४५) **तुकाराम कोकाटे**—श्रीबाबांनी पाणी याच्याकडूनच तापवून घेतले, त्यांना दुसरा कोणी चालत नसे. त्याचेकडून सेवा करून घेतली व त्याचेवर प्रेमाचा वर्षाव केला.

४६) **मद्रासीबाई**—सुंदर भजने गावयाची इच्छा पूर्ण करून रामरूपात दर्शन देऊन धन्य केले.

४७) **तिचा पती**—अहंकार घालवला, लोकापासून परावृत्त केले. दृष्टांत देऊन मुसलमानाच्या दैवताचे पूजन त्याचे घरी होते हे दाखवून दिले व रामदासांचे रूपात दर्शन दिले.

४८) **बाबासाहेब तर्खड**—अखंड सहवास. पत्नीचा व पुत्राचा दृढभाव पाहून कृपादृष्टी केली. बंद दरवाजातून प्रवेश करून कोणतेही रूप घेता येते हे दाखवून दिले.

४९) **बेरे**—चोरटे प्रवासात लुटतील या भीतीने त्यांना अभय देऊन त्यांचे चोरट्यांपासून रक्षण केले व सुखरूप पोचवले.

५०) **बाळाबुवा सातारकर**—एका रामनवमीला कीर्तनाला पाचारण करण्याची काकासाहेबांना प्रेरणा देऊन शिर्डीत आणवले. विठ्ठलरूपात दर्शन देऊन ५०० रु. बिदागी देऊन अनुग्रह केला.

५१) **शेवडे**—आपले पदीची निष्ठा आठवून त्यांना परीक्षेत पास केले, पूर्ण अनुग्रह केला.

५२) **विजयानंद**—मद्रासी संन्यासी. मानस सरोवराला जात असता त्याचा मरणकाळ ओळखून आपले जवळ ठेवून त्याला मुक्ती दिली.

५३) **(बापूगीर) रामगीर**—बापूगीर नावाने प्रेमाने हाक. नानासाहेबांकडे आरती व अंगारा देऊन पाठवले. प्रवासाची उत्तम सोय केली. स्वतः टांगेवाला होऊन टांग्यातून प्रवास घडविला.

६३) **गोखले बाई**–होळीच्या सणाला उपाशी राहून बाबा पावावेत म्हणून हट्ट करण्याचा गोखलेबाईंना दादा केळकरांकडे पुरणपोळ्या करून सर्वांना वाटून स्वतःला यथेच्छ जेऊ घातले व पूर्ण अनुग्रह केला.

६४) **आनंदराव पाखाडे**–स्वप्नात दृष्टांत दिला. दर्शन दिले व श्यामरावाला रेशीमकाठी धोतर द्यावयास लावले.

६५) **बाळाराम धुरंधर**–या विनयशील गृहस्थांना विठ्ठल रूपात दर्शन देऊन चिलीम ओढायची सवय नसता ती ओढावयास लावून त्यांचा दम्याचा विकार घालवला.

६६) **अमीर शक्कर**–वातविकारापासून मुक्तता. आज्ञाभंग करताच थोडीशी शिक्षा केली. परंतु संपूर्ण रोग घालवून विखारापासून रक्षण केले.

६७) **रघुनाथराव तेंडुलकर**–इमानीपणाने नोकरी केल्याचे बक्षीस म्हणून स्वप्नांत दृष्टांत देऊन योग्य ती पेन्शन देवविली व योगक्षेमाची काळजी दूर केली.

६८) **आळंदीचे स्वामी**–कर्णरोगाने पिडीत होऊन व्यथित होऊन शिरडीत आले त्यांचा कर्ण रोग बरा केला.

६९) **दत्तोपंत**–हरद्याच्या दत्तोपंताना १४ वर्षे पोटशूळ होता. केवळ दृष्टीने तो बरा करून त्यांना मनःशांती दिली.

७०) **मालेगावचे डॉक्टर**–पुतण्याचा हाड्यात्रण ऑपरेशनने बरा होईना तो उदीने व कृपाशीर्वादाने बरा करून डॉक्टरांना भक्ती मार्गाला लावले.

७१) **वांद्रे येथील गृहस्थ**–मृत पिता रात्री पीडा देऊन झोपू देत नसे. उदी लावून व उशाला घेऊन झोपताच त्या गृहस्थाला निद्रा मिळू लागली. मनःशांती लाभली.

७२) **रामचंद्र पाटील**–दुखण्याने बेजार झाले असता स्वतः बिछान्यावर बसून अभय दिले व त्यांना बरे केले. यांचे करारी स्वभावाने श्रीबाबांचे शरीर बुटी वाड्यात विसावले आहे हीही साईंचीच प्रेरणा.

**७३) नांदेडचे पुंडलीकराव**-श्रीवासुदेवानंद सरस्वतींनी दिलेला नारळ (श्रीबाबांना) चुकून फोडला. म्हणून दुःखित झाले पण तो माझ्या संकल्पानेच फुटला ही समजूत.

**७४) भक्त पंत**-शिरडीस दर्शनास येण्याची टाळाटळ. स्वतःच्या गुरुवर निष्ठा. फीट येवून बेशुद्ध होताच उदी व तीर्थाने शुद्धीवर येतात. स्वतःच्या गुरुपायी भाव ठेवण्याची आज्ञा होते.

☆


# खालील प्रसंग कोणत्या अध्यायात आहेत ?

**विधान बरोबर आहे-[ ]**

१) बाबांनी पाऊस थांबविला—अ. १२, ९, [ ११ ] १६
२) ब्रह्मलोभी मारवाड्याची गोष्ट—अ. ६, [ १६ ] २, १
३) चोळकरांचा साखरेचा नवस—अ. ५, ३२, [ १५ ] ८
४) भिमाजी पाटीलाचा कफक्षय—अ. ९, [ १३ ] ४७, ५२
५) चनबसाप्पा व विरभद्राप्पा वैर—अ. [ ४७ ] ५, ३८, ४१
६) दाभोलकरांना 'हेमाडपंत किताब—अ. १६, [ २ ] ४८, ५३
७) बाबांना गुरूंचे दर्शन—अ. १६, [ ३२ ] ५१, १८
८) बाबांच्या अंगुष्ठातून गंगोदक वाहू लागले—अ. १२, [ ४ ] ३, २७
९) श्रद्धा व सबूरी मंत्र—अ. [ १९ ] २२, ४१, ४८
१०) शामाला विष्णू सहस्त्रनामाची दीक्षा—अ. १२, [ २७ ] ३१, ५०
११) विजयानंद संन्यासी देहावसान—अ. [ ३१ ] ५, ३८, ४१
१२) डहाणूला देवांच्या घरी बाबांचे भोजन—अ. ९, ४१, ३८, [ ४० ]
१३) लखमीचंदाला स्वप्नात बाबांचे दर्शन—अ. [ २८ ] १२, १९, ४४
१४) काकाजीस सप्तश्रृंगीचा दृष्टांत—अ. २४, [ ३० ] ९, १७
१५) रामगीर गोसावी जामनेरला गेला—अ. १२, १६, [ ३३ ] ४६
१६) डॉक्टर पिल्ले नारूव्यथा—अ. [ ३४ ] ३१, १२, १८
१७) धरमसीशेठ व निर्बिज द्राक्षे—अ. १८, ३६, [ ३५ ] १२
१८) बाबा होळीपौर्णिमेला हेमाडांकडे भोजनास गेले—अ. २३, १३, [ ४० ] ५
१९) बायजाबाईचे मांडीवर बाबांचा देहत्याग—अ. १६, [ ४२ ] ९, २८
२०) त्या अध्यायाला रुद्राध्याय म्हणतात—अ. २६, [ ११ ] १९, १५

**—श्री. माधव गोरे**, कुर्ला मुंबई ७०

# कला महर्षी श्री. जाधव मास्तर निर्मित मयूर रथात साईबाबा विराजमान !



महाराष्ट्राचे थोर कलावंत महर्षी श्री. जाधव मास्तर यांनी शिर्डी संस्थानला भेट देण्यासाठी बिल्लोरी कांचानी अलंकृत केलेला एक नेत्रदीपक असा मयूर रथ बनविला होता. मुंबईतील विविध क्षेत्रातील सहस्त्रावधी साईभक्तानी या रथाचे काही काळ दर्शनही घेतले. त्यानंतर तो शिर्डीला नेण्यात आला. त्यावेळी श्री. बाबासाहेब भोसले हे न्याय विधी मंत्री होते. त्यांच्या हस्ते या रथाची स्थापना करण्यात आली आणि त्यानंतर ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. बाबांची सेवा कधी फुकट जात नाही, मात्र 'श्रद्धा आणि सबुरी' हवी.

या रथात यापूर्वी साईबाबांचे पेंटिंग ठेवण्यात आले होते व त्या समोर थोर साईभक्त म्हाळसापती यांचा पुतळा हात जोडून प्रार्थना करीत असलेला होता तसेच कोचमनाचाही घोडे हाकीत असलेला पुतळा होता. आता रथातील ते साईबाबांचे पेंटिंग काढून त्या जागी साईबाबांचा पुतळा बसविण्यात आला आहे.

शिर्डी येथील मयूर रथात विराजमान होण्यासाठी हा पुतळा जाण्यापूर्वी मुंबई येथील श्री. जाधव मास्तर यांच्या 'गुरुप्रसाद' मध्ये द्वारकामाईत गुरुवारी ता. २६ मे रोजी सकाळी १० वाजता श्री. यशवंतरावजी चव्हाण (खासदार) यांनी पूजा केली. ही पूजा महालक्ष्मी मंदिराचे व्यवस्थापक श्री. गणपतराव सामंत यांनी, महालक्ष्मी मंदिराचे खास पुजारी पाठवून यथासांग करून घ्यायला मोठे सहाय्य केले.

त्यानंतर या पंचवीस फूट लांबीच्या मयूर रथात बाबांची मूर्तीमंत अस्तित्व दाखविणारी नयन मनोहर अशी मूर्ती मोठ्या समारंभाने दि. ३ जून गुरुवार रोजी आमदार श्री. वामनराव महाडीक यांच्या हस्ते बसविण्यात आली. या समारंभाचे अध्यक्ष शिर्डी संस्थानचे कोर्ट रिसिव्हर श्री. क. हि. काकरे हे होते. या समारंभासाठी मुंबईहून खास मंडळी गेली होती. त्यांत, महालक्ष्मीचे महाव्यवस्थापक श्री. गणपतराव सामंत, सौ. संध्याताई सामंत, मालवणहून जनार्दन वायंगणकर, श्री. जी. एन्. चव्हाण व श्रीपत वर्टी व सौ. सरोज वर्टी, आदि साईभक्त होते. हा समारंभ रात्री ७ ते ९-३० पर्यंत चालला. या प्रसंगी श्री. वामनराव व सौ. महाडीक यांना शिर्डी संस्थान तर्फे शाल व श्रीफळ देण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री. क. हि. काकरे व श्री. पाठक यांनी सर्व सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे आभार मानले.

**—श्री. र. ग. वायंगणकर**

# श्रीमत परमहंस सिध्दारूढ स्वामी

(हुबळी–कर्नाटक)

ह. भ. प. कीर्तनकार
—श्री. चिंतामण लक्ष्मण शिंत्रे
शिंत्रे निवास डी/१४
दहावा रस्ता चेंबूर मुंबई ७१

जन्मलग्न कुंडली




जन्मकाल–सन १८३७
मोगलाईतील बिदरकोट गावी लिंगायत कुळात झाला.
समाधिकाळ भाद्रपद वद्य दशमी १०

१) तनुस्थान–गुरु–आदरणीय श्रेष्ठ हुद्दा.
२) मंगळ–हटयोगी–योगेश्वर.
३) चंद्र–सात्वीकवृत्ती–खूप प्रवास.
४) शनि–वैराग्यवृत्ती–एकांतवास राजविलासी.
५) शुक्र–भाग्यवान–मठाधिपति.
६) दशमस्थान–गंगास्नान.
७) राहू–मातेकडून–भाग्योदय.
८) बुध–वक्तृत्व उत्तम प्रगतीपथावर.

चरीत्र भाग–वडील शांतप्पा व आई मल्लम्मा ही दोन्हेही शिवभक्त व सत्वशील. वडीलानी वीरभद्र शिवयोगी यांचा आशीर्वाद घेतला व त्यांच्याच कृपा प्रसादाने तीन मुले झाली. धाकटे युवराज म्हणजेच श्री सिद्धारुढ महाराज हुबळी हे होत. लहान पणापासूनच बुद्धी तीव्र होती. तसेच ईश्वर भक्तीतही गोडी लागलेली 'शिव-शिव' नामाचा ते सतत जप करित असत. कथा, कीर्तनादी ऐकावयास जात. वीर-भद्रअय्या यांच्या प्रवचनांचा परिणाम त्यांच्या बाल मनावर फारच झाला. पुढे पुढे तर शिवाचेच खेळ खेळू लागले. खेळताना तर त्यांनी एकदा गळयात साप घातला, व मीच शिव आहे असे सांगू लागले. वयाच्या पंधराव्या वर्षी ते घराच्या बाहेर पडले. खुपखूप भटकले हालही फार झाले. परंतु 'देह जावो अथवा राहो! शिवनामी

दृढभावो ' या उक्तीप्रमाणे शिवनाम कधीही सोडले नाही. नंतर शिवयात्रा करीत राहिले. यात्रा करीत करीत ते गोवळकोंडा येथे आले, व तेथेच एका गुहेत ध्यानस्थ बसले, समाधान लाभले. त्यानंतर ते गुंटकल येथे आले. तेथून जवळच अमर गुड्डास एक सिध्द पुरुष रहात होते. त्यांचेही त्यानी दर्शन घेतले 'दर्शने दोषनासती' या उक्तीप्रमाणे दर्शन घेतल्याबरोबर अंगाला रोमांच उभे राहिले. मग त्यांनी त्यांनाच गुरु मानले. गुरुउपदेश केला गेला. आता त्याना सर्वत्र एकदम प्रकाश–प्रकाशच पडल्यासारखे वाटू लागले. मग गुरु माऊलीने त्यांना सांगितले की, हे पहा–मोठ्या झाडाखाली दुसरे झाड वाढत नाही, म्हणून तू आता येथे राहू नकोस. तुला वेगळे स्थान पाहिजे, व तुझे कार्यही वेगळे आहे. म्हणून तेथून ते निघाले. तत्पूर्वी त्यांनी गुरुमाऊली समोर एका ब्राह्मणाला वेदांत समजावले मग हुबळी येथे वास्तव्य करण्याचे ठरविले. हुबळीत आल्यावर त्यांनी तेथे बरेच चमत्कार केले. ते आता गुरुकृपेने सिध्द बनलेले होते. म्हणून लोक त्यांना 'सिध्दारुढ' म्हणू लागले. ते कुंडलिनी जागृत करीत. त्यांना बऱ्याच भाषा अवगत होत्या. त्यांना त्यांच्या शिष्यानी मठ बांधून दिला तर एका भीष्माने लाकडी त्यांच्याच सारखा हुबेहुब पुतळा तयार करून दिला. तो पहाताना अगदी सजीव आहे असे वाटते. लाखो भक्त येतात. दर्शन घेतात. महापुजा होते. जत्रा भरते, त्यांचे अनेक शिष्य झाले. परंतु पट्ट शिष्य मात्र एकही झाला नाही. ते फार मोजकेच बोलत असत. पण त्यात खुप अर्थ भरलेला असे. मठाच्या नजीकच त्यांनी समाधिची जागा बांधून ठेवलेली होती. अनेक संत यांच्याकडे येत असत. भेटून जात कारण त्यांना त्यांचा अधिकार कळलेला होता. लोकमान्य टिळकही त्यांना भेटून गेले होते. ते सिध्दयोगी होते. आपली कैलासात जाण्याची वेळ येताच त्यांनी समाधिस्थानी जाऊन समाधि घेतली. आजही ते आपल्या भक्ताना दर्शन देतात. परंतु श्रध्दाभक्ती मात्र निस्सीम हवी. असे होते हे सिध्दारुढ महाराज.

# भारतातील श्रीसाईबाबांची मंदिरे

265

( मागील अंकावरून क्रमशः )

[ असंख्य साईभक्तांनी केलेल्या मागणीमुळे मोठ्या कष्टाने व परिश्रमाने संग्रहीत केलेली ही सूची एप्रिल अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. आमच्या असंख्य भक्तांना ही सूची नक्कीच संग्राह्य वाटेल. का. सं. ]

५९) श्रीसाई मंदिर – मु. पो. आयसुकापल्ली ( आं. प्र. )

६०) श्रीसाईबाबा मंदिर – फोर्ट, मु. पो. बेल्लारी (कर्नाटक राज्य)

६१) श्रीसाईबाबा मंदिर – मु. पो. पसीव्हेडला, ता. कोव्वुर जि. पश्चिम गंगा

६२) श्रीसाईराम मंडपम् – ऑफ बाजार, किल्ला, वरदराज स्वामी मंदिरासमोर मु. पो. आर्णी ( दक्षिण भारत )

६३) श्रीसाई साक्षात्कार मंदिर – मु. पो. त्रिवेंद्रम ( केरळ )

६४) श्रीसाईबाबा मंदिर व श्रीसंती आश्रम – मु. पो. संती आश्रम, तोतापल्ली हिल्स, ( आंध्रप्रदेश )

६५) श्रीसाईबाबा भजन मंडळी मंदिर – संत चेरुऊ जवळ, मार्केट स्ट्रीट मु. पो. काकीनाडा ( आंध्रप्रदेश )

६६) श्रीसाई मंदिर – तिर्थान्नली मु. पो. नेलोर, जि. शिमोगा, म्हैसूर राज्य;

६७) श्री प्रेम साई मंदिर – मु. पो. पालघाट ( केरळ )

६८) श्री साईबाबा मंदिर – मु. पो. इलूरा जि. इ. जी. पूर्वगंगा ( आंध्रप्रदेश )

६९) श्री साईबाबा मंदिर – मु. पो. तिरूमंगलम् ( तामीळनाडू )

७०) श्री साईबाबा मंदिरम् – बोसरोड, स्वराज्य टॉकीज जवळ, मु. पो. तेनाली ( आंध्रप्रदेश )

७१) श्री साईबाबा मंदिर – जुनी मर्डीपल्ली, मु. पो. सिकंदराबाद

७२) श्री साईबाबा मंदिर – श्रीरामनगर, राजमहेंद्री, ( आंध्रप्रदेश )

७३) श्री साई मंदिर – मु. पो. इच्छापुरम ( आंध्रप्रदेश )

७४) श्री शिरडी साईबाबा मंदिर – गांधीनगर, मु. पो. नेलोर, ( आंध्रप्रदेश )

७५) श्री साईबाबा मंदिर – गोमटेश्वर हिल्स, गुढीरेल्वे स्टेशन जवळ, मु. पो. गुढी ( आंध्रप्रदेश )

( क्रमशः चालू )

# दर्शनासाठी

दूर दूर दूर तुझी शिर्डी साईनाथा ॥
कशी घेऊ झेप आता
सांग सांग साईनाथा ॥

तुझ्या दर्शनासाठी, तुझ्या दर्शनासाठी
नेत्र माझे उपाशी
नेत्र माझे उपाशी
दूर दूर दूर तुझी शिर्डी साईनाथा ॥

**—कु. सुधा अर्जुन शिवलकर**
मांडवी, बंदररोड, भडंग नाका,
रत्नागिरी

★

# श्री साई

साईलीला आहे जगी अगम्य
ईश्वरासच आहे ती शक्य
लीला ह्या पाहोनी भक्त झाले धन्य
लाखो भाविकांस स्मरणीय नित्य
असो साईदेवा कृपा तुझी
भिन्नत्व गळो देहामाजी
नंतर प्रकाशो ज्योत ज्ञानाची
दर्शने हेत पुरवा भक्तांची
नमन स्वीकारा हे फूल कोरांटी

**—श्री. वि. म. पुराणिक**
बँक ऑफ इंडिया, स्पायसर कॉलेज
औंध, पुणे ४११००७

# वाद कशाला ?

[ श्री साईबाबांचे मूळ गाव, त्यांचे आई वडिल कोण ? वगैरेसंबंधी वाद आहे. पण खऱ्या भक्ताला या वादाशी काय कर्तव्य ? कारण– ]

वाद कशाला हवा निरर्थक कोण साईचे बाप आई ।
आम्हा बालका आज मिळाली साईरुपी ही आई ॥ धृ० ॥

महानाटकी तू गे आई नाना रूपे तू घेशी ।
कधी होशी तू मुंगी माशी फकिर होवुनी कधी फिरशी ॥

दवा देवुनी दीन दुबळयांना दुःख दूर गे तू करिशी ।
दत्त दिगंबर होशी कधी तू होशी अक्कलकोट निवासी ॥

नाना जागी नाना भक्ता एकच वेळी तू दिसशी ।
चित्र रुप ते घेऊनी कधी तू भक्तांच्या भवती राहशी ॥

हस्तचालने विविधवस्तू अन विभुती उद्भव तू करिसी ।
कधी कुणाच्या स्वप्नी जाऊनी शिक्षाही देशी ॥

लौकिक दृष्टया शिक्षण नसता पढितांना तू हारविशी ।
वेदस्मृतींचा अर्थ दावुनी गीता गायन तू करिसी ॥

धन्य जाहलो कलियुगी आम्ही मिळवुनी तुजसम गे आई ।
किती काळजी करिसी आमुची होऊ कसे उतराई ॥

—श्री. रा. ग. गुप्ते
३५/बी–२८ मनीषनगर
अंधेरी (पश्चिम)

★

# मशिदीत प्रगटला साई जगदीश्वर

रामचंद्र प्रभू झाले अयोध्या ।
वृंदावनीचा कृष्ण कन्हैय्या ॥
स्तंभी प्रगटला तो सिंहनर ।
मशिदीत प्रगटला साई जगदीश्वर ॥ १ ॥

मंदीर मशिद एकच साची ।
अल्ला राम हे देव एकची ॥
सीता शोधण्या आला वानर ।
मशिदीत प्रगटला साई जगदीश्वर ॥ २ ॥

हिन्दू यवन हे एकच असती ।
देवा जवळी त्या भेद न असती ॥
जळी प्रगटला तो रामेश्वर ।
मशिदीत प्रगटला साई जगदीश्वर ॥ ३ ॥

—**प्रा. हरीभाऊ बोबडे** एम. ए. बी. एड.
अध्यापक, श्री देवराव ठाकरे विद्यालय
अशोकनगर, व्हाया-धामणगाव रेल्वे
जि. अमरावती

☆

# साईध्यान

निंबवृक्षतळी असे स्थित सदा पाषाण सिंहासनी
दत्तात्रेयमलंग वेष करूनी स्वामी बसे काननी

एकासी मुडपून पाय दुसरा ठेवी जमिनीवरी
पायाशी बसुनीच श्वान बघते मूर्ती खरी ईश्वरी

अंगाला कफनी शिरास पटका पोशाख हा पांढरा
साईनाथ फकीर प्रेमळ असे आई जशी लेकरां

भिक्षापात्र रितेच ठेवि जवळी भिक्षान्न सेवी मुनी
पापक्षालन कर्मदोष हरणा येई सदा धावुनी

रक्षा-शक्ति प्रदान नित्य करिते ही द्वारिकेची धुनी
भक्तां अंकित संकटी प्रभु असा बोले समाधीतुनी

अंगुष्ठद्वयजात तीर्थ करिते भक्तां सदा पावन
गीतातत्व विवेचन स्त्रवतसे होण्यास ज्ञानी जन

नेत्री प्रेम दया क्षमाच सगळा शांतीकृपासागर
साई हा अवधूत दत्त जणु की भोळा असे शंकर

देई स्वामीसमर्थ आशिषकृपे जे जे असे ईप्सित
वर्णाया सगुणस्वरूप गुरुचे शार्दूलविक्रीडित

ब्रह्मानंद स्वरूप सद्गुरु असा बैसे जगत्पालना
साई ध्यान असे वसोत हृदयी साईपदी प्रार्थना

—डॉ. प्रा. मा. चिं. दिक्षित
१२०६/३२ अ, शिरोळे रोड,
शिवाजीनगर, पुणे ४

# ध्या नाम मुखी श्रीसाई गजानन सोपे

आज भाग्य उदया आले
श्री साईच्या कृपे
शेगावी रमावर आले
श्री साई गजानन रूपे धृ०

लावून ध्यान बसताच समोरी आले
उमगले न मजला हे तीन स्वामी बसलेले
'हम सब एक है' वदती तीनही रूपे
ध्या नाम मुखी श्रीसाई गजानन सोपे १

सद्भक्त रंगले शेगावी गजानन नामी
क्षणांत समोरी दिसती अक्कलकोट स्वामी
तत्क्षणीच दिसती श्रीसाई गजानन रूपे
ध्या नाम मुखी श्रीसाई गजानन सोपे २

अक्कलकोट शेगाव अन् शिर्डी तीर्थस्थान
घडताच पडते पदरी पुण्यदान
दीनोध्दारक आले श्रीसाई गजानन रूपे
ध्या नाम मुखी श्रीसाई गजानन सोपे ३

पोतनीस विनवीतो ब्रह्मा विष्णू महेशा
ध्या चरणी सेवा हीच सदा मनिषा
पतित पावना तुम्ही साई गजानन रूपे
ध्या नाम मुखी श्रीसाई गजानन सोपे ४

—श्री. डी. वी. पोतनीस
पिंपरी, पुणे १७

२६८५७

# शिर्डीचे फळ

शिर्डीचे फळ ना कधी सुकती
ठायीठायी असे त्रिपादांची वस्ती
या लागी परमार्थ विरक्तता सेवन
ऐसे करी जो चुकवी जन्म-मरण

वासनांचा गलबला गोवित जना
आकाशी पतंग जैसा स्थिरवेना
गुरु कात टाकताना ईश लाधला
प्रचिती देऊन भक्ताना साई लोटला

विश्वाची गाठ सुटताना घटिकेसी
मन शुद्ध होता चिंता हरपसी
हृदयी निमताना भ्रांती उडाली
सहज मुक्त करताना लीला केली

ग्रहपीडा जाताना संसार सागरी
रोगाची गाठ सुटताना शरिरी
विघ्नहर्ता सुखदाता ऐसी माऊली
बोध मुखी घास घेताना झाली

स्वप्नी येऊन शंका विरोनी
भाव दाटला लीन होऊनी
देहप्रेम सांडुन साईत रमावे
पुण्याचे संचय जीवनी करावे

**—श्री. सुरेन्द्र यशवंत पाटील**
मालवणी म्युनिसिपल कॉलनी,
५/९२४, मालाड (पश्चिम)
मुंबई-४०००९४

# श्रीसाई प्रसन्न

निंबवृक्षाखाली जात्याची तळी ।
उध्दारूनी गेली साईनामे ॥ धृ ॥

कडू तो निंबवृक्ष गोड त्याची पाने ।
उध्दारूनी गेली साईनामे ॥ १ ॥

पडकी मशिदीत चावडी भरे नित्य ।
उध्दारूनी गेली साईनामे ॥ २ ॥

द्वारकामाईत जळते धुनी रात्र-दिन ।
उध्दारूनी गेली साईनामे ॥ ३ ॥

लक्ष्मीबाईस रुपये दिले नऊ ( नवविधा ) ।
उध्दारूनी गेली साईनामे ॥ ४ ॥

महाराची पोर पाणी घाले पणत्यात ।
उध्दारूनी गेली साइनामे ॥ ५ ॥

तसेच आम्ही उध्दारूनी जावे साईनामे घेता
हेची मागणे श्री साईनाथा ॥ ६ ॥

—सौ. शारदा वाकनीस
सि. जी. एस कॉलनी ५२/५५०/II
ॲन्टाप हिल मुंबई ३७

# नामरुपा

तुझे नाम घेता माझे मन तृप्त होते
सारे भवभय ओझे सहजी पार होते ॥ धृ० ॥

आर्त आंधळा मी भोळा
किती साहू हा सोहळा
पैलतीर दावी डोळा
दुःख दूर होते ॥ १ ॥

कुणी म्हणे निराकार
कुणा भेटसी साकार
दूर करी अंधःकार
मन द्विधा होते ॥ २ ॥

सामोरा मी पाहे तूज
कृपावंत तूचि मज
सर्वसौख्य लाभो मज
प्रार्थितो मी तू ते ॥ ३ ॥

सारे विश्व तुझे रुप
गुण दोष अपरुप
पाहतो मी तव रुप
मन शांत होते ॥ ४ ॥

—श्री. महादेव साने
‘ अमित ’, पुणे-बंगलोर महामार्ग,
मु. पो. कऱ्हाड, ४१५११०

# एक थे बाबा

एक थे बाबा एक थे बाबा ।
कितने अच्छे कितने सच्चे ।।
उनके दरबार में ना कोयी छोटा
ना कोयी बडा सभी एक समान ।
एक थे बाबा ।

इन्होने कितने लोगोंको अच्छा किया ।
कितने लोगोंको सबक सिखाया
एक थे बाबा ।

इन्होने कितने लोगोंको समझ सिखाया ।
इन्होने कितने लोगोंको अच्छी बातें बताई ।
पर लोग उन्हे समझ न पाये ।
उनके दरबारमें कोयी जाये तो
खाली वापस नहीं आये ।
एक थे बाबा ।

मैं जबसे उनकी भक्त बनी ।
तबसे ऐसा लगता है ।
कब ओ मुझे मिलेंगे ।
पर हमारी नसीब कहाँ
हम ना उनको देख पाये
ऐसे अच्छे, ऐसे सच्चे बाबा
कहाँ आजकल हमें मिलेंगे ।
ऐसा लगे उनके द्वार ।
मैं बैठी रहू सिर्फ उन्हे देखती रहूँ ।
उनकी पूजामें मग्न हो जाऊँ ।
एक थे बाबा, कितने अच्छे, कितने सच्चे ।

उनसे ना कभी अलग हो जाऊँ
ये बेटी-पिताका रिश्ता ना टूटे

मेरे अच्छे बाबा कितने सच्चे बाबा
कोई उनसे इस दूनियामें वापस बुलाले।
मेरे बाबाको वापस बुलाले।
एक थे बाबा। एक थे बाबा।

—कु. कल्पना वापीवाला
रामप्रसाद को. ऑपरेटिव्ह हौसिंग
सोसायटी ब्लॉक नं. १
चार बंगला, अंधेरी मुं. ५८

## श्री साईबाबा

सकल जन, थोरवी तुझी गाई
देवा साई, तूच बाबा अन् तूच आई!
नाम तुझे घेता हृदयी
तिमिर विरुनिया जाते,
लाभते सुख-समृद्धि
हास्य पुन्हा विलसते!
दर्शनाची तुझ्या, ओढ मला लागते,
चरणावर साई तुझ्या, लीन व्हावे वाटते

—श्री. विठ्ठल कृ. याळगी
१९७०, कडोलकर गल्ली, बेळगाव, ५९०००२

# साई महिमा

साईनाम वाचे नित्य जो उच्चारी ।
तया साई तारी सर्वकाळ ॥

बाबांची विभूती लाविता ती भाळी ।
विघ्ने तीच टाळी भाविकांची ॥

ध्यास ज्या अंतरी असे त्या नामाचा ।
भार वाही त्याचा नित्य साई ॥

धुनी तीच त्यांची द्वारकामाईत ।
ज्योत अंतरात प्रज्वलीत ॥

साईनाथ भक्ती तिथे तीच शक्ती ।
मनाची आसक्ती त्याच ठायी ॥

धाव घेई मना साईच्या दर्शना ।
पुरवी कामना साईनाथ ॥

शिरडी ती पंढरी साई पांडुरंग ।
रंगे अंतरंग साईकृपे ॥

लीन हा चरणी असे सख्यादास ।
मनी एक आस दर्शनाची ॥

—श्री. स. मा. मुन्हार
प्लॉ. नं. १२४ चंदन नगर नागपूर
(मेडीकल रोड)

271

# शिरडी-वृत्त माहे जून १९८२

जून महिन्यामध्ये बाहेरगावाहून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी पहिल्या पंधरवड्यात जास्त प्रमाणात होती. त्यानंतर गर्दीचे प्रमाण थोडे कमी झाले. काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली. ती खालीलप्रमाणे-

**कीर्तन**- १) ह. भ. प. रामराव गोविंदराव डुकरे, पेठ बुलढाणा

**प्रवचन**-१) ह. भ. प. घनश्याम माधवराव पैठणकर, येवला
२) ह. भ. प. मीराबाई संजयानंद, बद्रीनारायण
३) ह. भ. प. मुरलीधर पाटील देशमुख, शिर्डी
४) ह. भ. प. रामेश्वर राधाकिसन उघडे, सेलू

**भजन, गायन वादन वगैरे**- १) सौ. नलिनी मुळगावकर, मुं. २) श्री. उमेश मुळगांवकर, मुं. ३) श्री. रतनलाल लखीचंद छाजेड, कोल्हापूर ४) श्री. जयवंतराव कुलकर्णी, मुं. ५) श्री. अनिल मोहिले, मुं. ६) कु. संगीता कुलकर्णी, मुं. ७) श्री. साईनाथ भजनी मंडळ, ऑटीमिट्टा ८) श्री. दत्तवेंकट साई संस्थान, कल्लूर ९) सौ. आरती अशोक जाधव, वसई १०) श्री. अशोक भीमसेन जाधव, वसई ११) स्वामी संजयानंद, बद्रीनारायण १२) श्री. एम. केशवय्या, हैद्राबाद १३) श्री. मनोहर शहाणे, इंदौर १४) श्री. सुधाकर द. दिक्षीत १५) श्रीमती राजेश्वरी दिक्षीत १६) चि. हितेंद्र दीक्षीत १७) श्री. के. के. प्रकाश सिकंदराबाद १८) श्री. जी. बी. इश्वरराव, सिकंदराबाद १९) श्री. आर. इश्वरदासजी, सिकंदराबाद २०) श्रीमती चंद्रकला, गुंटूर २१) विजया, मदुराई २२) श्री. रतनलाल शर्मा, नागपूर २३) सौ. चंद्राबेन विठ्ठलदास भाटे, मुं. २४) कुमार पारसमल चंपालाल पोरवाल, चांदराई २५) सौ. आर. चल्लामा, ग्वाल्हेर २६) श्री. सत्यनारायण जाधव, हैद्राबाद २७) श्री अविनाश लक्ष्मण कथले, सातारा.

**हवापाणी**-शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

## श्री. भिका शाऊत यास गोडाखिंडी पुरस्कार

श्री साईबाबा संस्थानचे माजी शासकीय अधिक्षक श्री. गोडाखिंडी यांनी त्यांच्या पत्नी सौ. सुशिलाबाई गोडाखिंडी यांचे नावे रु. ५०१/- देणगी रूपाने साईबाबा संस्थानला दिले. त्या रकमेवरील व्याजातून आरोग्य खात्यातील उत्कृष्ट कामगिरी कर-

णाऱ्या व्यक्तीस मानधान देण्याचा उपक्रम सुरू केला. ही एक उल्लेखनीय गोष्ट आहे.

यंदा या बक्षिसाचा मान श्री. भिका उखा शाऊत आरोग्य खाते कर्मचारी यांना मिळाला. श्री. भिका शाऊत हे प्रथमपासून संस्थान नोकरीत आहेत. त्यांचे वडील श्री. उखा शाऊत हे आरोग्यखात्यात कामास होते. ते सेवेतून निवृत्त झाल्यानंतर घरचा सर्व भार सांभाळण्याची जबाबदारी श्री. भिका शाऊत यांचेवर आली व त्यांनी प्रथमपासून संस्थान नोकरीचा स्वीकार केला.

कोणत्याही प्रकारचे व्यसन नसलेली ही व्यक्ती सांगाल ते काम आनंदाने स्विकारून चोखपणे पार पाडत असते.

वरिष्ठांचा योग्य तो मान ठेवण्याचा व आपले काम अधिकाअधिक चोख करण्याचा प्रयत्न ते करीत असतात. यांची सन १९८१ सालात कोणत्याही प्रकारची गैरहजेरी नाही. उत्कृष्ट काम याबद्दल सन १९८१ चे चांदीचे पदक व प्रशस्तिपत्रक यांना देण्यात आले.

★

## श्री. केशवराव प्रधान यांचे निधन

मराठीतील प्रख्यात लेखिका, समाज कार्यकर्त्या साईभक्त प्रा. डॉ. सौ. चारुशिला गुप्ते यांचे बंधू श्री. केशव रामचंद्र प्रधान यांचे २८ मे ८२ रोजी अचानकपणे निधन झाले. त्यांचे वय ७५ वर्षांचे होते. ते पण साईभक्त होते. व नित्य परमेश्वर कार्यात मग्न असत. एकावेळी ते नाथ बँकेत नोकरीस होते.

श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवो.